
क्र.नं. ४५४८
REFBK-0004250



आवृत्ति २ री. ले० तिवारी.

हें पुस्तक मुंबई विद्याखात्यानें प्राथमिकशाळा, हायस्कुलें व ट्रेनिंग कॉलेजें यांतून बक्षिसें व लायब्ऱ्या यांकरितां मंजूर केलें आहे.

वऱ्हाड मध्यप्रांत शाळाखात्यानें मिडल्स्कुलें, हायस्कुलें व नार्मलस्कुलें यांतून बक्षिसें व लायब्ऱ्या यांकरितां मंजूर केलें आहे.

दक्षिणाप्राईझ कमेटी–पुणें आणि महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक मंडळ–इंदूर या दोन्ही संस्थांनीं यास बक्षिसें दिलीं आहेत.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ४२५०

॥ ॐनमश्चंडिकायै ॥

काव्यकिरणमाला-किरण पहिला

# महाराणा प्रतापसिंह

## (खंडकाव्य)

लेखक:-

दु. आ. तिवारी-जळगांव.

ग्रंथकर्त्यानें सर्व हक्क स्वाधीन ठेविले आहेत.

जळगांव येथें श्रीकृष्ण प्रिंटिंग प्रेसमध्यें

नामदेव माधव नेमाडे, यांनीं छापिलें

आवृत्ति २ री.

फेब्रुवारी १९३०

किंमत १० आणे.

REFBK-0004250

# ग्रंथकर्त्याचे दोन शब्द.

'महाराणा प्रतापसिंह' या खंडकाव्याची ही दुसरी आवृत्ति प्रकाशित करितांना फार समाधान वाटत आहे. पहिली आवृत्ति तारीख ११।२।२६ रोजीं प्रकाशित झाली होती. या पुस्तकावर महाराष्ट्रांतील निवडक वृत्तपत्रें व मासिकें यांच्या विद्वान संपादकांनीं जे रसिक व मार्मिक अभिप्राय दिले ते या आवृत्तीस जोडले आहेत. हें खंडकाव्य जसें महाराष्ट्रीय रसिकांच्या आदरास पात्र झालें तसेंच तें दक्षिणा प्राईझ कमेटी–पुणें व महाराष्ट्र ग्रंथोत्तेजक मंडळ--इंदूर या संस्थांच्या बक्षिसासही पात्र झालें. त्याच प्रमाणें मुंबई सरकार व नागपूर सरकार यांनीं हें पुस्तक बक्षिसें व लायब्ररऱ्या या करितां मंजूर केलें. म्हणून मी या सर्वांचा फार आभारी आहें.

या दुसऱ्या आवृत्तींत एक सर्ग [ सर्ग २ रा. ] अधिक घातला असून प्रसंगानुरूप पांच चित्रें दिलीं आहेत. अवघ्या एक महिन्यांत ही आवृत्ति मनोहर छापून दिल्याबद्दल येथील श्रीकृष्ण प्रिंटिंग प्रेसाचे मालक श्री. नामदेवराव माधव नेमाडे यांचाही मी आभारी आहें. बालोद्यान प्रेस–पुणें याचे मालक श्री. सहस्रबुद्धे व चित्रकार श्री. र. द. गोडबोले ऑर्टिस्ट--पुणें यांनीं सुंदर चित्रें काढून स्वल्प किंमतींत त्यांचे ब्लाक करून दिले या विषयींही त्यांचे आभार मानणें उचित होय.

जळगांव
ता १७।१।३०

दु. आ. तिवारी.

# ' महाराणा प्रतापसिंह ' या खंडकाव्याच्या पहिल्या आवृत्तीवरील कांहीं विद्वान संपादकांचे अभिप्राय.

## वृत्तपत्रें:—

**केसरी—पुणें** ( ता. ४-५-२६ )

" स्वातंत्र्य रक्षणासाठीं ज्यानें प्रसंगीं सर्वस्व त्याग करून वनवास पतकरिला व अनुकूल काल येतांच मेवाडचें स्वातंत्र्य प्राप्त करून घेतलें त्या मानधन व वीरसिंह महाराणा प्रतापाचें स्फूर्तिदायक चरित्र कवि तिवारी यांनीं पांच सर्गात गायिलें आहे. **काव्याचा प्रसंग मनोहर असून कवीनें उत्तम प्रकारें रंगविला आहे. भाषा प्रौढ व सुरस आहे.** "

**नवाकाळ—मुंबई** ( ता. २५-३-२६ )

" महाराणा प्रतापसिंह हें खंडकाव्य महाराष्ट्रास परिचित असलेल्या श्री. तिवारी कवि ह्यांच्या लेखणींतून उतरलें आहे. श्री. तिवारी ह्यांनीं आजपर्यंत प्रसिद्ध केलेल्या मनोहर लीला, प्रसन्न राधा, राधा—माधव, ह्या खंडकाव्याहून प्रस्तुत काव्याचा विषय भिन्न आहे. अरवलीच्या वनवासांत दैवदुर्विलासांत दिवस काढणाऱ्या राणा प्रतापानें ' दैवं निहत्य कुरु पौरुषमात्मशक्त्या ' या स्फूर्तिदायक संदेशास जागून दैवाला लाथ मारून पराक्रम करून दाखविला. प्रचंड मोंगल सेनेशीं झगडून मेवाड स्वतंत्र केलें आणि गेलेलें राज्य परत मिळविलें हा या खंडकाव्याचा विषय आहे.

याचे एकंदर पांच सर्ग आहेत. पहिल्या सर्गात प्रतापाचा अरवली पर्वतांतील वनवास, दुसऱ्या सर्गात प्रतापाची पत्नि पर्वतांत

चुकली असतांना मोंगल लोकांच्या हातीं सांपडते. परंतु मोठ्या धैर्यानें नायकाला ठार मारून आपली सुटका करिते. तिसऱ्या सर्गांत दुसऱ्या एका तुकडी बरोबर तिला लढावें लागतें व ती मूर्च्छित झाली असतां मोंगल शिपाई तिला घेऊन जातात. चवथ्या सर्गांत राणाप्रताप आपल्या पत्नीची सुटका करितो आणि शेवटच्या सर्गांत मुलुखगिरी करीत करीत राणाप्रताप पुन्हां उदेपुरांत प्रवेश करितो असें वर्णन करण्यांत आलें आहे.

···**काव्याची शद्बरचना एकंदरींत सरळ आहे. काव्य रसाळ आहे··आणि कांहीं ठिकाणीं तर पद लालित्य उत्कृष्ट साधलें आहे.** प्रतापाची पत्नी यवन सेनेच्या नायकाला आवेशपूर्ण वाणीनें बोलत आहे; त्याचें वर्णन पुढील प्रमाणें केलें आहे.—

आत्मप्रौढी करित तुझिया सारखे वीर गेले ।
ना श्वानांच्या मुखिं चघळण्या हाड त्यांचें मिळालें ।
यद्वाहूच्या वरतिं विजयश्री सदा राजियेली ।
त्या सिंहाची प्रियतम सखी जंबुका ! वांछियेली ?

**एकंदरींत हें खंडकाव्य चांगलें साधलें आहे** व ह्याच विषयावर किंवा ह्याच्यासारख्या दुसऱ्या विषयावर **श्री. तिवारी महाकाव्य लिहिण्याचा प्रयत्न करतील** अशी आह्मी आशा व्यक्त करितों. ''

**प्रबोध–धुळें** (ता. २१।३।२६)

"श्री. तिवारी यांचें हें आनंद पर्यवसायी खंडकाव्य आहे. या काव्याचे पांच सर्ग आहेत. **वीररसप्रधान काव्यें रचण्यामध्यें रा. तिवारी यांचा हातखंडा दिसतो.** ह्या काव्यामध्यें वीर रसाबरोबर करुण रसाचाही स्वाद घेण्यास सांपडतो. संपूर्ण काव्य वाचलें असतां महाराणा प्रतापसिंहाचा उत्कष्ट देशाभिमान, जाज्वल्य धर्मा-

भिमान, अलौकिक शौर्य, निधडी छाती, निस्सीम पत्निप्रेम इत्यादि वीरोचित सद्गुणांचा जसा चांगला परिचय होतो तसाच रजपूत वीरांगनाही कशा शूर, धाडसी आणि पतिव्रता असतात ह्याचीही चांगली जाणीव होते. निरनिराळ्या वृत्तांमध्यें **निरनिराळे बहारीचे प्रसंग कवीनें फारच उत्कृष्ट रीतीनें वर्णन केले आहेत."**

**प्रागतिक- जळगांव** (ता. २०।९।२६)

"खान्देशांतील सुप्रसिद्ध कवि श्री. दुर्गाप्रसाद आसाराम तिवारी यांनीं लिहिलेलें प्रस्तुत खंडकाव्य काव्यकिरण मालेचा पहिला किरण-ह्मणून प्रसिद्ध झालें आहे. **तिवारी कवींची कविता आतां तारुण्य भरांत येत आहे.** तिवारींची शद्वरचना विषयाशीं तादात्म्य पावलेल्या स्वरूपांत प्रगट होते. तिवारींच्या अभंग मालेंत तर याचा वाचकांला चांगलाच अनुभव आला आहे. **महाराणा पतापसिंह या काव्यांत** शौर्य धैर्यादि गुणांचें वर्णन करितांना **तिवारींची भाषा परिणाम-कारक वठली आहे.** या कांव्याचे पांच सर्ग केले असून महाराणा प्रतापसिंह आणि त्याची पतिव्रता स्त्री यांना अरवली पर्वतांतील एका अरण्यांत अकबरशहाच्या प्रबळपणामुळें कांहीं दिवस वास करावा लागला. वनवासांत असतां चितोडच्या पारतंत्र्यामुळें प्रताप-सिंहाचे अंतःकरण कसें तुटत होतें त्याचें योग्य वर्णन करून प्रताप-सिंहाच्या राणीवर एका मोगल स्वारानें अचानक एका झऱ्याच्या कांठीं पातिव्रत्य नाशाचा प्रसंग आणिला त्यावेळचें चन्द्रचित्र कवीनें सुंदर रेखाटलें आहे. त्या दुष्टाचा राणीनें अचानक वध केला. त्यावेळीं:-

॥ विद्युत्क्षोभें उमलुन मही वृक्ष जैसा पडावा ॥
॥ कीं तोफेनें बुरुज वरचा खालतीं कोसळावा ॥
॥ कीं बंधारा नवतटनिनें आदळावा धडाडा ॥
॥ अल्ला! अल्ला! म्हणत गतिला पावला कामवेडा ॥

असें वर्णन केलें आहे. शेवटीं प्रतापसिंहानें शत्रूला जिंकून पुन्हां आपल्या राजधानींत प्रवेश केला. या प्रसंगाच्या सर्गांतील कविता वाचनीय आहेत."

**स्वराज्य–पुणें** (ता. १०।६।२६)

"मराठींत खंडकाव्याचा प्रघात कमीच आहे. प्रस्तुत काव्याला मेवाडाधिपती महाराणा प्रतापसिंह यांचें वीर्यशाली चरित्र कथानक ह्मणून घेतलें आहे. काव्याचा विषयच करुण व वीर या रसांनीं युक्त असा आहे. व त्यांत कवि **तिवारी यांच्या सारख्या ऐतिहासिक काव्यलेखनांत कुशल अशा लेखकाच्या जोरदार भाषेची जोड मिळाल्यामुळें काव्य सरस व स्फूर्तिदायक वाटतें.** कवीच्या पूर्व कीर्तीला साजेशी ही कृति आहे. काव्याकिरण मालेला पहिलाच किरण उज्वल लाभला आहे."

**महाराष्ट्र–नागपूर** (ता. ११।४।२५)

"रा. दुर्गाप्रसाद तिवारी यांनीं महाराणा प्रतापसिंह याच्या चरित्रांतील उज्वल प्रसंगावर हें सरसकाव्य लिहिलें आहे. या पंच-सर्गात्मक काव्यांत रसानुरूप वृत्तयोजना केली असून निरनिराळ्या प्रसंगांचें वर्णनही मोठें हृदयंगम केलें आहे.······**काव्याची रचना एकंदरींत सफाईदार असून राष्ट्रीय भावनेचा परिपोष करावयाला या काव्याचा चांगला उपयोग होईल.**"

**उदय--उमरावती** (ता. ८।६।२६)

"ह्या पांच सर्गात्मक वृत्तबद्ध लहानशा सरस काव्यांत **कवीनें आपल्या आजपर्यंतच्या कीर्तीला साजेल अशाच रीतीनें** महाराणा प्रतापसिंहाच्या चरित्रांतील **अंगावर रोमांच उभे करणारे प्रसंग वर्णन केले आहेत.**"

## मासिकें:—

**विविधज्ञानविस्तार—मुंबई** ( ता. ६ मे १९२६ )

" उदेपूरच्या राणा प्रतापसिंह याचें चरित्र आधींच स्वाभिमान व स्वातंत्र्यप्रेम यांना भरतें आणणारें आहे. त्याच्यावरच या पंचसर्गी काव्याची उभारणी करण्यांत आली असल्यामुळें तें विशेष परिणामकारक झालें आहे… प्रस्तुत खंडकाव्य चांगलें वठलें असून **कवीच्या काव्य लौकिकांत तें निःसंशय भर घालील** असें आह्मांस वाटतें."

**सहविचार—बडोदें** ( ता. १६-७-२६ )

" महाराणाप्रतापसिंह हें खंडकाव्य महाकाव्याच्या धर्तीवर रचिलें असून चार वेगळाल्या वृत्तांत याचे पांच सर्ग केले आहेत. **प्रतापसिंहाच्या वीर्यशाली कथेस गाणारा कविही वीररसात्मक कवितांसाठीं नांवाजलेला मिळावा हा मणिकांचन योग.** व्याकरण व छंदःशास्त्रदृष्ट्या शुद्ध रचना, सात्विक भाव, वीर व करुण रसाचा परिपोष यांच्या योगानें काव्य तरुण पीढीच्या हातांत देण्यास निःसंशय योग्य झालें आहे.

**उद्यम—नागपूर** [ अंक ५ वर्ष ८ वें ता. १।५।२६ ]

" रजपुतांचा इतिहास ह्मणजे जळजळीत स्वधर्माभिमान आणि दैवी वीर्य यांची मूर्तिमंत खाणच आहे. आणि **महाराणा प्रतापसिंहाचे** ठिकाणीं या दोहोंच्या जोडीला देशाभिमानाची भर मिळाल्यामुळें त्याचें **चरित्र त्रिवेणी संगमासारखें पुण्यपावन आणि स्फूर्तिप्रद होऊन राहिलें आहे.** याच महोदार चारित्र्याचे श्री. **तिवारी यांनीं आपल्या ओजस्वी वाणीनें या काव्यांत वर्णन केलें आहे. तें रसिकास मुग्ध करील यांत तर शंकाच नाहीं.** पण आजच्या पोकळ देशभक्तीच्या काळांत राहणाऱ्या लोकांस आदर्श

देशवीरांचें हें चित्र पुष्कळच बोधप्रद वाटेल व त्यास कर्तव्यपथावर आणून सोडील यांतही शंका नाहीं. ”

मराठी शिक्षक—पुणें ( एप्रिल १९२६ )

“ वीररसमय ऐतिहासिक कथानकें स्फूर्तिदायक काव्य-रूपानें वर्णन करण्याविषयीं या कवीचा जो लौकिक आहे त्याचा प्रत्यय काव्यरत्नावलींतून पूर्वी खंडशः प्रसिद्ध झालेल्या याही खंडकाव्यांत येतो. प्रस्तुत पुस्तकानें तें काव्य वाचकांस एकत्र मिळ-ण्याची सोय झाली आहे.

आनंद—पुणें

“ मेवाडचा प्रतापशाली वीर महाराणा प्रतापसिंह याच्या चरि-त्रांतल्या एका चटकदार प्रसंगावरचें हें सुरस काव्य वाचकांच्या मनाला चटका लावून सोडणारें आहे. ”

भारतमित्र—गोवे ( जुलै १९२६ )

“ जळगांव येथील मित्राचे प्रसिद्ध कवि श्री. दु. आ. तिवारी यांच्या तेजस्वी लेखणींतून प्रस्तुत पुस्तकाचा उदय झाल्यामुळें त्याची तेजस्विता और आहे. म. प्रतापसिंहानें “ दैवं निहत्य कुरु पौरुषमात्म-शक्त्या ” या स्फूर्तिदायक संदेशास जागून दैवाला लाथ मारून पराक्रम करून दाखविला. प्रचंड मोंगल सेनेशीं झगडून मेवाड स्वतंत्र केला आणि गेलेलें राज्य परत हस्तगत केलें. असा प्रस्तुत काव्याचा महत्त्वाचा विषय असल्यानें पांचही सर्ग वाचतांना वाचकांच्या अंगीं स्फूर्ति उत्पन्न झाल्यावांचून रहात नाहीं. ”

# महाराणा प्रतापसिंह.

अतुल देशाभिमान व निःसीम धर्माभिमान या दोन गुणांनीं उदेपूरचा राणा प्रतापसिंह भरतखंडांत अजरामर होऊन राहिला आहे. राणाप्रताप यानें जेव्हां मेवाडचा राजमुकुट धारण केला तो काळ महत्वाचा होता. अकबराच्या प्रतापभानूनें उत्तर हिंदुस्थानांतील सर्व राजमुकुट तेजोहीन केले होते. त्याची मनधरणी करण्याकरितां कित्येक रजपूत राजांनीं त्याच्याशीं आपल्या बहिणींचीं व मुलींचीं लग्नें लावून दिलीं. परंतु मेवाडच्या सिसोदिया वंशानें मात्र आपल्याला हा कलंक लावून घेतला नाहीं. मेवाडास स्वतंत्र राखून आपलें कुलही शुद्ध राखण्यास राणाप्रताप याचे शौर्य, धैर्य, मनोनिग्रह वगैरे अनेक गुण कसोटीस लागले. कांहीं झालें तरी अकबरापुढें मान लववायाची नाहीं हा त्याचा दृढ निश्चय होता.

अकबराच्या अफाट फौजेनें प्रतापास उदेपूर सोडण्यास भाग पाडिलें. तेव्हां त्यानें कुमळमेर ही आपली राजधानी केली. तरी मोगली फौजेनें त्याचा पिच्छा पुरविला. अंबेरचा राजा मानसिंग याज बरोबर प्रताप जेवला नाहीं. या मानभंगामुळें तो सेलिमासह प्रचंड सैन्यानिशीं प्रतापावर चालून आला. वीस हजार मेवाडी रजपूत राणाजीच्या झेंड्याखालीं जमा झाले. हें १५७६ सालांतील हळदीघाटाचें युद्ध इतिहासप्रसिद्ध आहे. या प्रसंगीं प्रतापानें शौर्याची पराकाष्ठा केली. तीन वेळां तो ऐन गर्दीत घुसला व त्यानें मोगली फौजेचा धुव्वा उडविला ! १४००० मेवाडी रजपूत धारातीर्थी पडले व शेवटीं राणाप्रताप यास आपल्या परिवारासह अरवलीपर्वताचा आश्रय करावा

लागला ! तरी अकबराचा त्रास देण्याचा उद्योग चालूच होता. या वेळीं त्यानें ज्या आपत्ति भोगिल्या त्या आज केवळ इतिहासांत वाचल्या तरी अंगावर काटे येतात. जेवतां जेवतां मोंगलांचा छापा आला हें ऐकतांच त्यास पुढचें ताट सारून उपाशी २-२ दिवस फिरावें लागे अशा एका प्रसंगीं राणीनें क्षुधाशमनार्थ गवताच्या बियांच्या २-३ भाकरी केल्या. त्यांतील अर्धी भाकर राजकन्येच्या वांट्यास आली ! तिच्या प्रेमळ मातेनें त्या अर्ध्या भाकरीपैकीं चतकोर आतां खा व चतकोर रात्रींकरितां राखून ठेव; असें तिला सांगितलें व तिनें तसें केलें. इतक्यांत एका रानमांजरानें ती राखून ठेवलेली चतकोर भाकरी पळविली त्याबरोबर राजकन्येनें किंकाळी फोडिली व ती ओक्साबोक्सी रडूं लागली.

यावेळीं राणाप्रताप हा शत्रुसैन्याचा कोणत्याप्रकारें पराजय करितां येईल या विवंचनेत अगदीं व्यग्र झाला होता. त्यानें कन्येच्या रुदनध्वनीनें मान वळवून पाहिलें व पत्नीस तिच्या रडण्याचें कारण विचारिलें. तेव्हां संध्याकाळ करितां राखून ठेविलेली चतकोर भाकरी नाहींशी झाली म्हणून कुमारी किंकाळून रडत आहे असें त्यास कळलें;

अहा ! मेवाड देशाच्या प्रतापी राण्याच्या कन्येला चतकोर भाकरीकरितां रडावें लागत आहे, कोण हा प्रसंग ! या गोष्टीचा राणाजीच्या मनावर इतका परिणाम झाला कीं परम निग्रही अर्थात् वज्रतुल्य असें त्याचें हृदय फुटून गेलें. आणि या कारुण्यविवशतेंत त्यानें अकबराला एक पत्र लिहिलें त्यांत "तुझ्याशीं लढावयास मला थोडा अवसर दे" एवढेंच धर्मयुद्धाचें एक वाक्य होतें. परंतु या पत्रानें जणों काय राणा आपणास शरणच आला आहे अशी अकबरानें आपली कल्पना करून घेतली व त्यानें दिल्लीशहरांत रोषनाई केली ! बिकानेरचा राजा राजसिंहाचा भाऊ पृथ्वीराज हा अकबराच्या दरबारीं होता. तो शूर असून स्वतः कवि होता त्यानें यावेळीं राणाप्रतापास एक कविताबद्ध

पत्र लिहिलें या पत्रानें राणाप्रतापाचा उत्साह द्विगुणित झाला. त्यानें भिल्लांचें प्रचंड सैन्य जमा करून मोंगली फौजेवर निकराचे हल्ले केले. व मेवाडास स्वातंत्र्य मिळवून दिलें.

अरवली पर्वतांतील वनवासांत मोंगलांच्या आकस्मिक हल्ल्यानें राणा व राणी यांची चुकामूक झाली म्हणजे २।४ दिवस त्यांच्या गांठीही पडत नसत. अशाच एका प्रसंगाचें कथासूत्र या खंडकाव्यांत आहे.

या काव्याचे आतां ६ सर्ग झाले आहेत. पहिल्या सर्गांत राणाप्रताप व त्याची पत्नी यांचा अरवली पर्वतांतील वनवास वर्णिला आहे. दुसऱ्या सर्गांत पृथ्वीराजानें राणाजीस जें पत्र लिहिलें व राणाजींनीं त्या पत्राचें उत्तर पाठविलें त्या विषयींचा कथाभाग आहे. तिसऱ्या सर्गांत राणाप्रतापाची रमणी चुकलेल्या स्थितींत एका निर्झरणीच्या तीरीं एकटीच बसली असतां तेथें प्रतापास शोधणारी एक मोगल लोकांची तुकडी अचानक आली. तिच्या नायकानें भूपांगनेशीं कामुकतेनें लगट केली तिनें त्यास कमरेच्या खंजीरानें ठार केलें. ४ थ्या सर्गांत तिनें उरलेल्या लोकांशीं युद्ध करून त्यांतील बहुतेकांस परलोकीं पाठविलें. इतक्यांत दुसरी तुकडी आली त्या तुकडीशीं लढतांना ती खड्ग--प्रहारानें मूर्च्छित झाली. तिला तशा स्थितींत सेनानायकानें आपल्या घोड्यावर घालून तो जयानंदानें परतला. ५ व्या सर्गांत राणाप्रतापास ती वातमी लागतांच तो भिल्लांचें सैन्य घेऊन निघाला व त्यानें सर्व मोंगल कापून आपल्या अर्धांगीची सुटका केली. हाच स्वातंत्र्य--जयाचा शकुन मानून राणाप्रतापसिंहानें पुढें एकामागून एक हल्ले करून मोगलांच्या ताब्यांत गेलेला सर्व मुलूख सोडविला. मेवाडास स्वतंत्र केलें व उदेपुरांत प्रवेश केला. हा भाग शेवटीं ६ व्या सर्गांत आहे.

# महाराणा प्रतापसिंह

## सर्ग १ ला.

सम्राट अकबराच्या असंख्य फौजेपुढें आपला निभाव लागत नाहीं असें पाहून राणा प्रतापसिंहानें अरवली पर्वताचा आश्रय केला. याच बरोबर त्याची राणीही वनवासाचें दुःख भोगण्यास निघाली ! तेव्हां प्रजाजनांना फार दुःख झालें. पशु पक्षी देखील रडूं लागले. राजमहालांत राहणारें, पंच पक्वान्नाची रुचि घेणारें तें राजदांपत्य भिल्लांच्या झोंपड्यांत कंदमुळावर दिवस काढूं लागलें !

एका बाजूस मांडीवर पत्नीचें शिर व दुसऱ्या बाजूस नंगी समशेर अशा स्थितींत राणाजीनें मोगलांची चाहूल ऐकत रात्रीच्या रात्री जागून काढाव्या. केव्हां केव्हां मोगलांच्या हातावर तुरी देऊन जातांना धांदलींत त्या पतिपत्नींची ताटातूट व्हावी ! शत्रूनें लगट केली कीं राणाजीनें संमुख होऊन युद्ध करावें व पुढचा मार्ग काढावा. जागोजाग अरवलीच्या लाल भडक झालेल्या शिला प्रतापाच्या शौर्याची साक्ष देत होत्या. हेरांनीं राणाजीच्या हाल आपेष्टांचें व त्यांच्या शौर्याचें वर्णन अकबरापुढें केलें तेव्हां तो गहिंवरून ह्मणालाः-- "वारे प्रताप ! त्वां आपलें ब्रीद राखिलें. त्वां आपल्या कुलाला कलंक लागूं दिला नाहीं. मला तुझें राज्य नको, तूं माझ्या दरबारांत येऊन मला एक वेळ सलाम कर !" प्रतापसिंहानें आपली मान लवविली नाहीं, त्यानें विश्वासू व जीवास जीव देणारें भिल्लांचें सैन्य जमविलें. हा कथाभाग या पहिल्या सर्गांत आहे.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क. ४२५०

मंदाक्रांतावृत्त.

**प्रतापसिंहाचा वनवासः--**

आत्मैश्वर्यें गगनिं विलसे जेविं चंडप्रताप[१]
राजस्थानीं नृप विकसला तेविं राणा 'प्रताप'!
मेवाडाची मिरवित शिरीं राज्यलक्ष्मी प्रकांता[२]
स्वातंत्र्याच्या अतुल समरीं रक्त ओतीत होता! १

होता वैरी अकबरशहा सैन्य--सामर्थ्यवान
भूपालांची लववि किरिटें रत्नदैदीप्यमान!
यातेंही तो प्रबळ घडवी राजसंन्यास--योग।
देशप्रेमी सहन करिती प्राप्त दुर्दैवभोग! २

त्याच्या शीर्षीं तरु मिरविती चामरें पल्लवांचीं
वेली प्रेमें स्त्रविति वरुनी गंधमाला सुमांची
गाळोनी त्या किसलयपुटीं बाष्पबिंदु प्रभातीं
तत्दुःखाची हळहळ मनापासुनी दर्शवीती! ३

जो दीनांना कठिणसमयीं आश्रयस्थान व्हावा
त्यानें का तो अरवलिगिरी आश्रयाला वरावा!
जो अंबारीं नृप मिरविला दिग्गजीं वाहनांत
मेवाडाचा धनि भटकतो आज रानावनांत! ४

---

१ सूर्य २ तेजस्वी.

तैं मोरांचे नयन गळती, कोकिळा मूक होती
दंती 'किर' ध्वनि करिति तैं सिंह आराव[1] देती
विद्युन्माला चमकति, नभीं वर्षती मेघपंक्ति
भूपालाची स्थिति सकळिकां जाहली तापदा ती ! ५

प्रतापाची धर्मपत्नी:--

रामामागें जनकतनया कोमलांगी निघाली
तैं लोकांचे नयन भरले, लागले हात भाळीं !
तैसे दु:ख--व्यथित जनही त्या प्रतापप्रियेला--
पाहोनीया पदर अपुला लाविती लोचनांला ! ६

कांतामागें निबिडविपिनीं आर्यदेवी निघाल्या
सीता देवी द्रुपददुहिता, भीमकी भूपबाला;
तो सेवोनी समुचित पथ श्रेष्ठ आर्य स्त्रियांचा
साध्वीनें हा विषय दिधला वर्णण्याला यशाचा ! ७

तो मंदार्क क्षितिजगत, ती शुक्र बालेंदु--रेखा !
कीं तो भासे दिनकरमणी; तीहि संध्या बिलोका !
सत्काव्याचा निधिच जणु तो, अर्थ--सत्संगती ती
सद्भावाला अनुसरतसे काय कीं ईशभक्ति ? ८

वर्षाकालीं अनुसरतसे स्त्रग्विणी सागरातें
कीं पद्माच्या सहचि नलिनी क्षुब्धलाटेंत जाते

---

१ शब्द.

मेघांतूनी विधु विचरतां चंद्रिका जाय जेवीं
सौंदर्यत्यक्ता सति अनुसरे ती प्रतापास तेवीं ! ९

तन्नेत्रातें बघुन हरिणी चालतां स्तब्ध होती !
पाहोनीया गजगति तिची, हस्तिणी थांबताती !
प्रासादाच्या वरुनिहि कधीं साध्वि यावी न खालीं,
नाथामागें अहह ! विपदा भोगण्याला निघाली ! १०

मातेला जे चुकुन फिरती लोलनेत्रें वनांत
येती सारे मृगशिशु तिला मातृमोहें पहात !
तोंडामध्यें हरित तृण तें, कर्ण उंचावलेले
त्यां पाहोनी हृदय सतिचें होय अत्यंत ओलें ! ११

कष्टें केली मृदुतर जिची रम्य शय्या सुमांची
भीती जावी तरिहि न जिच्या कोमला सेविकेची !
ती मृद्वंगी विषमविपिनीं प्राणनाथानुषंगी
केव्हां भूमीवर कधिं शिलस्थानिं झोपे कुरंगी ! १२

शीतांशूचा किरणहि जिला उष्ण केव्हां गमावा
चंडांशूचा खरतर कसा ताप तीनें सहावा !
चंद्रग्रावा[१] वितरुन जिचें आर्द्र व्हावें दुकूल
तें[२] घर्मातें पुसुनि पुसुनी हाय होई मळूल ! १३

१ चंद्रकांतमणी २ दुकूल.

लाक्षारागें[१] धवलचरणें रंगवीतां जियेचीं
व्हावी चित्रा वसुमति पतिप्रेम–संसेवनाची
पातिव्रत्यें विबुधजनता नित्य गाई जियेचीं
धूलीमाजी उमटति अहा ! पादाचिन्हें तियेचीं ! १४

" देहें माझ्या सदृश दिसते कोमला अंगना ही
या राज्ञीतें सुखवुं तरि मी कोणत्या त्या उपायीं
छायादानीं सजुन लतिका[२] पल्लवाग्रांगुलींनीं–
बोलावीते निकट तिजला माल्लिका[२] अंकुरांनीं १५

आकाशींच्या चपल चपले ! नाच दावूं नकोस !
मेघा ! तूंही गडगड असा शब्द काढूं नकोस !
त्या भीतीनें जरि सुमतिच्या देहिं येतील कांटे
थोडें पुण्य प्रथम करितां पाप लागेल मोठें १६

ज्यांच्या पात्रीं शशिसम मुखें गुर्जरस्त्रीजनांचीं–
पुण्यस्नानीं विलसति सुरस्थानलुब्धाशयांचीं[३]
त्या यद्देहीं विहरति ' महीं-शर्वरी[४] ' भूप्रदेशी
अद्रीनें त्या[५] हृदयिं वरिलें राजरत्नद्वयाशीं ! १७

त्या दोघांचा शुचितर असा काननीं वास होतां–
भूमी होई सुमफलवती सुंदरा कांतियुक्ता.

---

१ लाक्षारंग २ मोगरी ३ स्वर्गेच्छूंचीं ४ मही व साबरमती ह्या नद्या ५ अरवली पर्वतानें.

छायावृक्षस्तबक--पवनें गंध वाही दिशांतें
धन्यात्मे ते सफल करिती संनिवास--स्थलांतें ! १८

होते कांहीं अनुचर सवें राजभक्तस्वभावी
ज्यांनीं भूपव्यसनसमयीं तुच्छ काया गणावी !
ज्यांनीं शौर्यें द्विषदरमणीहस्त[१] भाळास न्यावे
त्यांनीं आतां विकलहृदयें भूपवक्त्रीं पहावें ! १९

जेथें शोभे रविकरपरावर्तनें रश्मिजाल[२]
ऐशीं ज्यांचीं स्फटिकमय तीं दालनें हो विशाल !
त्या दोघांचे रुचिरतर ते शून्य झाले महाल
ते भिल्लांच्या गलित--कुटजीं लोटिती प्राप्तकाल ! २०

भिल्लीणींच्या नयनयुगुलीं सादरें वीक्ष्यवंती[३]
मेवाडाची भुवनजननी रूपसौभाग्यवंती
एका वस्त्रें निजतनु अहा ! झांकते चारुगात्रीं
कारुण्याचें जळ उपजवी योगिनी जीवनेत्रीं[४] ! २१

**देशभक्ताची तळमळः--**

व्हावा कैसा रिपु--जित तरी देश मेवाड मुक्त ?
चिंतेमध्यें नरपति बसे देहनिद्रा--वियुक्त
थोडीशीही वनपशुमुळें कर्णिं चाहूल येतां
'आले का ते यवन ?' उचली खड्ग तो म्लेंच्छहंता[५] २२

---

१ शत्रुस्त्रियांचे हात. २ किरणसमूह. ३ पहाण्यास योग्य. ४ मनु
ष्यमात्राच्या नेत्रांत ५ प्रताप.

अधाराचे पटल पसरी यामिनी भोंवताली
नैराश्याची नृपमनिं तमोव्याप्ति अत्यंत झाली !
व्योमांतोनी घनजल जसें वर्षतें भूमिभागीं
तैशीं गाळी नयनसलिलें जन्मभूमी--वियोगी ! २३

अंकीं निद्रागत सखिमुखीं ठेवि एका कराशीं
चिंताग्रस्त स्वमुख धरितो अन्यहस्तीं उदासी !
त्यातें वाटे रजनि अजुनी लुप्त होई न कैशी ?
दुःखावस्था कठिन दिन ती भासवीते पळाशीं २४

व्हावी देशस्थिति उचित, ही लागली ज्यास ओढ
बालार्काच्या अरुण--किरणीं पाहतो तो चितोड
दुःखोद्वेगें अवचिल तदा स्तब्ध होऊन पाही
निःश्वासाची पवनलहरी त्यावरी एक वाही ! २५

तो किल्ला, ते बुरुजहि जिथें सैन्य दिल्लीश्वराचें
क्षुब्धाब्धीची उसळत जणो लाट एकेक नाचे !
सामंतांचा अभिनव यशःकेतु तेथें दिसे ना
बालेंदूचा ध्वज चमकवी मोगली भव्य सेना ! २६

राठोडांच्या समररुधिरीं वाहिली जी प्रणाली[1]
तद्गंधानें वनपशु तिथें हिंडती भोंवताली !

---

१ रक्ताचे पाट.

जोहारांनीं तरुणि इतुक्या अग्निकुंडांत गेल्या--
कीं अस्थींनीं गिरिवरगुहा दर्शनक्रूर झाल्या ! २७

गेलासी तूं हर ! हर ! परी पारतंत्र्यीं चितोडा !
त्वद्दुःखाचा करिल जन तो कोण आतां निबाडा ?
नामामागें प्रियपद अशी लावितों 'सिंह' ऐसें
देशत्यागा करविति परी शत्रु हे दुष्ट कैसे ? २८

ज्याच्या शिर्षीं रवि करितसे देहविश्रामलीला
स्वातंत्र्याचा ध्वज तव शिरीं भव्य आरूढलेला
म्यां पाहावा परम वसते एक ही जीविताशा
होवो झाला महति तरि मी देइ ना देह--नाशा ! २९

**देशभक्ताची आर्धांगीः--**

तीरोद्भूत स्फुरवित नव्या यूथिकांचा[१] विहार[२]
वाहे रेवाजलपरिचित प्राण्हकाळीं[३] समीर
तो राज्ञीचा मुखपरिमलाकांक्षि[४] देहानुकूल
मंदावेगें करि हळु मुखाच्छादनाचें दुकूल ! ३०

किंचित् किंचित् नयन उघडी प्राक्स्फुटाब्ज--स्वरूपा
हस्तें बद्ध प्रथम करिते मुक्त वेणी--कलापा
वृक्षीं वृक्षीं खग--तति जिची कीर्ति गाऊन धाली
कांतांकाच्या गिरिवरि उषा झोंपलेली उदेली ! ३१

---

१ जाईची वेल २ बगीचा ३ सकाळीं ४ समीराचें विशेषण.

यद्वेणीशीं घनतति वळे कृष्ण शोभा तुलाया
शैलस्थानीं तिजहि अतुला वाटली भूपजाया !
कैसा व्हावा उपमित तरी तो पिसारा शिखीचा ?
किंवा तुल्य स्तबकहि कसा तो तमालद्रुमाचा ? ३२

अभ्रच्छायागत शशि जसा एकदां स्पष्ट व्हावा
तत्कांतीनें कुमुदिनि--मुखीं हर्ष कांहीं दिसावा
तो निस्तेज क्षणिं शशि दिसे, तीहि तेजोविहीना
तैशी राज्ञी पतिसह दिसे सौख्यदुःखीं विलीना ! ३३

केव्हां होई मुदित महिपोत्साह[१] पाहून तीही
केव्हां चिंताकुल बघुन त्या दुःखभारास वाही
दीपज्योती रुचिर अथवा मंद तेजें दिसावी
सौख्यीं दुःखीं पतिसह तशी शीलवंती दिसावी ५५

कैशी येई अवनिं अमरप्रार्थनायोग्य ही स्त्री ?
पाहायाला गिरिवरशिरीं प्रत्यहीं मेघ येती !
कोषागारीं नवरुचिरता राजराजेश्वराची
स्त्रीरूपानें प्रगटिली जणों, कल्पना मानसाची. ३५

पक्वान्नाच्या सम गणुनि ते सेविती कंद तेथें
ओढा वाहे झुळ झुळ, तिथें सेविती जीवनातें

१ प्रतापाचा उत्साह.

शैलारण्यीं मुळिं न मिळतां कंदमूलादि केव्हां
प्राशोनी ते सलिल नुसतें काढिती वेळ तेव्हां ! ३६

पर्वतांतील युद्धें:--

शोधायाला यवन जवळीं पातले आपणाशीं
वार्ता येतां त्वरित पळणें त्यास लागे उपाशी
केव्हां केव्हां उलटुन करी युद्ध सक्रोध--रीतीं
रक्तास्रावें अरवलि--गुहा देति चित्तांत भीती ३७

हातामध्यें रुधिरमय तें खड्ग, पाठीस ढाल
मागें मागें बघत नृपती—सिंह चाले कराल !
वृक्षच्छायातलिं बसुनि जों देहविश्रांति घ्यावी
तों वैऱ्यांचे कटुरव पुन्हां एकुनी ओठ चावी ! ३८

तो शैलाच्या गुहिं उडवुनी शत्रुचे देहखंड
दोर्दंडाचा विभव मिरवी शौर्यशाली प्रचंड
विच्छिन्नांच्या प्रवह--रुधिरीं देह होऊन लिप्त
जास्वंदीचा ललित फुलला कुंज वाटे प्रताप ३९

पृष्टस्कंधी असिधृतकरें वीर जों घाव घाली
त्या आघातें गिरिसम तनू शत्रुची तें निमाली !
कोठें दिल्ली, अरवलिगिरिप्रांत हा दूर कोठें ?
कोणाला ना नियम करवे मृत्यु येईल कोठें ? ४०

२३-१०-३२

रक्तस्थानें वनचरवधू भ्रूविलासें पहाती
तन्नेत्रांची रुचिर पसरे त्यावरी नीलकांती
वाटे गेला द्विरद[1] करुनी काय उत्खात--केली ?
ऐशी रम्या अचलवसुधा कौतुकस्थान झाली ! ४१

एकामार्गीं महिपवनिता अन्य--मार्गीं नृपाल
ऐशी होई विरहगति तैं कंठिती तेहि काळ !
त्या दोघांची स्थिति जणु हरिश्चंद्र--तारामतीची
सच्छीलांची विषम विधि कां घे परीक्षा जगाची ? ४२

रानोरानीं उभय विरही अंतरप्रेमयोगी
जेव्हां चिंताकुश फिरुनि ते भेटती दैवभोगी
तो तेव्हांचा प्रियजनसमानंद वर्णील कोण ?
प्रीतीकाव्यें कितिहि लिहिलीं तीं न होतील पूर्ण ४३

अकबराची इच्छा:-

देशासाठीं श्रम सहतसे कष्टवीतो तनूस
ऐकोनी तो अकबरशहा दु:खभारें मनास--
बोले--" मान्या ! रजपुतकुलीं धन्य तूंच प्रतापा !"
संरक्षाया स्वकुल जगतीं सोसिशी देहतापा ४४

कन्या किंवा भगिनि मजला देउनी तोषवाया
त्वज्ज्ञातीचे नृपति सजले धर्महानी कराया !

---

१ हत्ती.

श्रेष्ठा ! केलें कलुषित न तूं आपुल्या सत्कुलाला
होती धर्मच्युत न बुध तें, मृत्यु येवो तयांला ! ४५

त्वद्राज्याची खचित हृदयीं अल्प नाहीं मनीषा
देतों राज्य प्रिय तव तुला, एक आहे मदाशा
या सम्राटापुढतिं अपुली अल्प वांकीव मान
रत्ना ! तूंतें शिरिं धरुन मी श्रेष्ठ देईन मान ! ४६

मोठे मोठे समरविजयी स्तंभ जे वैभवाचे
साम्राज्याचे मुकुटमणि जे प्राण माझ्या जिवाचे
त्यांच्या वक्षीं निजपद दिला, चारिली धूळ त्यांना
राजस्थानीं तुजसम असा तूंच बा ! एक राणा ! ४७

मी त्वद्वैरी, परि नृपवरा ! त्वद्गुणाचा प्रणेता
दोंहातांनीं कवळिन तुला येथ नेत्रीं पहातां
पायीं केले नत जरि बिकानीर म्यां जोधपूर
मातें धन्याश्रम न गमतो तूं न येतां समोर !" ४८

प्रतापाचा निश्चयः--

सत्वाढ्याच्या फिरतिं नयनीं पूर्वजांचीं चरित्रें
लोभावेशें शिर न अपुलें वांकवाया प्रवर्ते !
ऐसें रत्न प्रसवुन जिनें भूषविलें महीला
देई ना हो ! कवण जन त्या धन्यता माउलीला ? ४९

कष्टें काढी विचरत वनीं भूपती दुर्दिनास
शौर्यें धैर्यें करि वनचरप्रीति--संकर्षणास
जैसे होती बकुळ विटपीं भृंग गंधानुलुब्ध
तैसे झाले वनचर अहा ! तद्गुणोत्कर्षबद्ध ! ५०

कैलासाचा अधिप गिरिजानाथ जो एकलिंग
सेवा त्याची क्षितिपति करी एकनिष्ठें अभंग
भिल्लीणींचे तनय तरुण त्र्यंबकेश प्रभूत
प्रेरी रायाजवळ सहजीं भव्य आत्मांशभूत ! ५१

ज्यातें ' स्वामी ' ह्मणतिल मुखें आपुला एक वेळ
त्यातें केव्हां त्यजितिल न ते, कापिला कंठनाल !
सिंहाशींही झगडतिल जे, मित्र ते काननाचे
प्रेमें झाले अनुचर तया वीरवंशोद्भवाचे ! ५२

मेघश्यामप्रभ तनु, तसें धैर्यही अंतरंगीं
धारावृष्टीमय करितिल क्षोणितें युद्धरंगीं
विद्युत्तेजें अधिप चमके त्यांत राणाप्रताप
वाटे गोळा तुटुन पडतां तीव्र देईल ताप ! ५३

अद्रिद्वारस्थित हरि करी गर्जना क्रूरतेनें
कीं तीरांतीं जलनिधि करी घोषणा ज्या प्रमाणें
तैसा होई यवनचमुशीं सज्ज तो सत्प्रतिज्ञ
" देशासाठीं तळमळ जया, काढितो मार्ग सुज्ञ " ५४

## सर्ग २ रा.

महाराणा प्रतापसिंह याच्या एका संधिपत्रावरून अकबरास इतका आनंद झाला कीं, त्यानें शहरांत रोषणाई केली व नृत्यगायनादि उत्सव केले ! बिकानेरचा राजा राजसिंह याचा भाऊ पृथ्वीराज हा अकबराच्या दरबारीं होता. तो अत्यंत साहसी योद्धा असून परम देशभक्त होता. प्रतापाचें शौर्य, धैर्य व स्वदेशभक्ति या गुणामुळें तो त्याचा भारी अभिमानी होता. शाहानें त्याला ती आनंदवार्ता कळविली तेव्हां त्याचा तिजवर विश्वासच बसेना. तो म्हणाला:- " राणाजीस मी आपणांपेक्षां चांगला जाणतों. हें पत्र त्याचें नाहीं. आपण आपला राजमुकुट जरी त्याला अर्पण केला तरी तो महापुरुष आपणांस वश होणार नाहीं." त्यानंतर त्यानें शाहाच्या परवानगीनें प्रतापास पत्र लिहिलें. पृथ्वीराज जसा शूर होता तसाच तो कवि होता. त्यानें राणाजीस लिहिलेलें पत्र कविताबद्ध होतें. त्या कविता अजूनहि रजपुत लोक मोठ्या आनंदानें गातात. पत्राची मूळ प्रत उपलब्ध नाहीं.

वृत्त–शिखरिणी.

अहा ! येऊं पाहे शरण एदिं मेवाड-नृपती !
शहाच्या तोंडानें परिसलि गिरा म्यां कटु अती !
खरी का ही वार्ता ? तुजसि पुसतों संगर-पटो !
तुझ्या धैर्याचा ना कुलपुरुषसिंहा तट फुटो ! १

तुझ्या हातीं आहे जंववरि कृपाण क्षितिपते !
प्रभा स्वातंत्र्याची वदनिं अमुच्या या तळपते !
तुवां हातांतूनी असि जरि नृपा ! टाकुन दिला,
मिशीच्या पीळाचा कराचि अमुचा कीं उतरला ! २

समर्पोनी शाहापुढतिं अपुलें खड्ग विजयी,
इथें मेवाडाचा अधिप शिर येऊन नमवी !
स्वनेत्रांनीं ऐसें करुणतर बा ! दृश्य बघणें,
बरें त्याच्यापेक्षां चिरुनि अपुला कंठ मरणें ! ३

प्रभो ! मेवाडाचें असिवरि उरे शौर्य तुझिया !
तसे स्वातंत्र्याचे किरण मुकुटि मात्र तुझिया !
कुलाची मर्यादा तव भुजचि संरक्षित असे !
पताका धर्माची जगिं तुजमुळें ही दिसतसे ! ४

निशा साम्राज्याची अजि भरतखंडांत यवनी !
जहाले निद्रेच्या वश सकल, तेजास हरुनी !
उभा धर्मद्वारावरि अचल तूं चैतकपती !
तुझी माता धन्य प्रसवुन तुला होय जगतीं ! ५

ध्रुव स्वस्थानाला त्यजिल, जलधी लंघिल तट !
उदञ्चन्मार्तंडें खुलतिलहि ते पश्चिम-पट !
प्रतापाचें शाहापुढतिं लवणें शक्य न शिर !
असो मच्चित्ताचा स्मृति--सुखद विश्वास अमर ! ६

अम्ही शिर्षस्थानीं जरिहि पगडीला मिरवितों,
तरी चित्तीं तूझ्या महति पगडीचीच गणितों !
विपत्तींचे आले ढग वळुनि राया ! कितितरी,
शहाच्या तूं पायीं लवविशि न तें भूषण परी ! ७

सुधांशूनें शोभे रजनि, चपळा कीं जलधरें,
प्रदानानें कीर्ती, रमणि रमणीय प्रियकरें,
अलंकारानें कीं तरुणि, नलिनी वा दिनकरें,
तुझ्या योगें तेवीं भरतमहि शोभे, वच खरें ! ८

गजेंद्राचा हंता मृगपति वनांतून विचरे,
तयाच्या शौर्याचा परि दशदिशीं धाक पसरे !
नृसिंहा ! तूं तैसा अरवलि—वनांतीं विचरशी,
शहाच्या साम्राज्यीं अखिल यवनीं धाक भरिशी ! ९

नव्हे ही मेघाली, यवनचमु--धूली उडतसे !
न ही विद्युत्, तेजें चपल असिधारावलि हसे !
नव्हे मेघांचें हें स्तनन, रणवाद्यें थडकलीं !
प्रतापा ! तूं झंझापवन वळतां, व्यक्ति नुरली ! १०

बुडाले हे राणे अकबरशहा--सिंधुसलिलीं,
तिथें तूं पद्माच्या सम विलसुनी कीर्ति वरिली !
समस्तांना धेनूपरि वळुनि तो कोंडुनि धरी,
शकेना कोंडाया तुजसम वृषाला महिवरी ! ११

दिल्या लेकी आह्मी बहिणि यवनांना निजकरें !
अधर्माचाराचें स्मरण घडतां तापचि भरे !
सिसोदी वंशाच्या परि पुरुषसिंहा ! निजकुल,
तुवां रक्षीयेलें निजभुजबलें सत्य विमल ! १२

विभा ! या देशाला तव भुजाचि आधार उरला !
तुला 'स्वातंत्र्याचा भजक' ह्मणुनी भाव धरिला !
निराशा--दुःखाचा तव वदनिं निश्वास निघतां !
तयाच्या शोकाची खळखळुनि वाहील सरिता ! १३

मदानें उद्भ्रांता अरि--विकटसेना बलवती;
विमर्दाया तीतें तुजविण दुजा कोण जगतीं ?
न सेना--संपत्ती जवळ तुझिया अल्प उरली,
कितीदां शत्रूला ध्वजाचि दिसतां भीति भरली ! १४

बलश्रेष्ठा ! होशी विमुख तरि मेवाड--भुवन,
हयांच्या टापांनीं विखरिल दुजा वीर कवण ?
कशा त्या शोभाव्या अरवलि--गुहा प्रेतनिकरीं ?
कुणाच्या शोभावा शिरिं विजय--रक्त ध्वज तरी ? १५

तुझी मी शाहाशीं कृति असतां श्रेष्ठ तुलना,
वदे रागें रागें मम कुलवती धर्म--ललनाः--
" हिऱ्याशीं काचेची कसलि तुलना नाथ ! करितां ?"
जहालों मी स्तब्ध श्रवणिं वचनाला परिसतां ! १६

कुठें तूं राष्ट्राचा भजक चतुरा ! संगरगुणी,
कुठें हा देशाचा छलक मदधारी अवगुणी !
कुठें निर्धाराची सुगुण तव मूर्ती स्थिरमती,
कुठें दीर्घद्वेषी विषधर शहा चंचलमती ! १७

इथें लोभें येती भजक यवनेशास भजती;
किती निर्लोभानें गृहिं गृहिं तुला लोक भजती !
स्वनामाचा येथें ध्वनि अकबरालाच सुखवी;
परी त्वन्नामाचा ध्वनि दशदिशेलागिं रमवी ! १८

स्वधर्मी तूं धर्मासमचि असशी बा ! दृढमती;
प्रतिज्ञेला पार्थासमचि असशी निग्रहि अती;
प्रदानानें कर्णस्मृति घडविशी याचक–जनीं
कवीच्या काव्याला उचित तव चारित्र्य भुवनीं १९.

कलंकी शीतांशू, हिमगिरि रवीनें वितळतो;
अही पाटीराच्या तरुवरि विषारी विहरतो;
सुरेशाचा आहे द्विरद मदमत्त प्रथित तो;
यशाशीं तोलाया विषय मज ना एक दिसतो ! २०

ज्वलच्छौर्यानें ज्या अरुण हळदी घाट दिसतो,
स्फुरद्वीर्यानें ज्या यवनयुवती--संघ रडतो,
चलद्वीर्यानें ज्या अकबर निजेला दचकतो,
गुणांचा त्या स्वामी विधि विपिनिं त्याला फिरवितो ! २१

नको कष्टी होऊं विगत निजभाग्य स्मरुनिया !
नको दुःखी होऊं खडतर अपेष्टा सहुनिया !
असे ऐश्वर्यादि क्षणिक सगळा भोग जगतीं !
विशुद्ध त्वत्कीर्ती चिर बहुत गातील सुमती ! २२

तुझी सेना जिंकी, धन--विभव जिंकी जरि शहा,
मही जिंकी, जेथें तळपति हमीरादिक अहा !
अजिंक्य त्वद्धस्तीं जंववरि असे खड्ग विजयी,
न जिंकी तो कांहीं, वचनिं नच संदेह लवही ! २३

निजेल त्वद्द्वेष्टा कधिं तरी शहा मृत्यु--कबरीं;
दिसेल क्षोणींद्रा ! हराळि उगलेली तिजवरी !
तदाही कीर्तीचा कळस तव तेजाळ विशद,
जगाच्या नेत्राचा विषय बहु होईल सुखद ! २४

इथें बैसे देशास्तव नृपति चिंतातुर मनीं;
इथें बैसे त्याच्या निकट रुचिरा वीर--रमणी;
तरूशीं बालांचे झुलति वनिं हिंदोलक इथें;
घडेल त्वत्प्रेमें करुण वनवास--स्मरण तें ! २५

तुझ्या मागें मागें विचरत असे जी तव सती,
मला वाटे खालीं अवतरलि सीता भगवती !
जियेच्या चारित्र्यें निखिल नरनारीहि हरिखो,
तिला माझी सांग प्रणति विसरूं बा ! मुळिं नको. २६

जयश्री भाग्याची, उदयपुर--लक्ष्मीच सुमुखी,
चितोडाचे राणे धवलतर तत्कीर्ति जणुं कीं,
जगत्पावित्र्याची जननि, तव जी धर्म--ललना ,
तया कल्याणीची स्मृति न वितरी शांति कवणा ? २७

निजावीं प्रासादीं मृदुल--शयनीं कोमल मुलें,
विधीनें तद्दैवीं कठिन वनवासास लिहिलें !
तयांचें होतांच स्मरण भरुनी कंठ मम ये !
तयांना संरक्षो विभु हरुनि तीं संकट--भयें ! २८

---

महाराणा प्रतापसिंहाचें उत्तरः-

किती लाटा माझ्या हृदय--जलधीला उसळल्या !
शरीरीं रोमांच्या तति किति थरारून उठल्या !
किती गात्रीं गात्रीं नवरुधिर--संचार घडला !
कवे ! त्वच्छब्दांचा अतुल महिमा मात्र सगळा ! १

तुटोनी हें माझें शिर समरभूमीवरि पडो !
विपत्तींच्या राशीवरि पडुन राशीहि चिरडो !
परी तें तुर्कांच्या पुढति न कधींही लवविन
प्रतिज्ञेला माझ्या मजसहचि येईल मरण ! २

असू दे पीळाचा कर तव मिशीलाच सु--भटा !
असू दे राजन्या ! मुखिं रजपुताची नव छटा !
नभीं पूर्व--द्वारामधुनिच सहस्रांशु वर ये,
प्रतापाचें म्लेंच्छीं अविनतचि राहील शिर हें ! ३

जयाला मी प्राणाहुनिहि जपलों शैलविपिनीं,
ध्वजाला त्या माझ्या बघशिल उदेपूर-भवनीं;

[stamp]

दिनीं एका तूंची पुसाशिल शहालागिं वचन,
" महाराणा आहे शरण तुजला कीं अशरण? " ४

गुणज्ञा ! केव्हांही ज्वर उलटलेला नच बरा;
रणज्ञा ! त्वेषानें हरि उलटलेला हि न बरा;
वदान्या ! मी माझी उसळि तुज सांगू तरि कशी ?
"करोनी दावावी कृति, वचनता व्यर्थ जगतीं ! " ५

सुशीला त्वत्कांता रणगुणसमुल्लासिनी सती;
अशा राजस्थानीं जंववरि सुमाता विलसती,
हराया स्वातंत्र्य प्रबळ खल आहे कवण तो ?
" जया देशीं माता सुमति, जगिं तो धन्य ठरतो ! " ६

---

## सर्ग ३ रा.

राणाप्रताप व त्याची पत्नि या उभयतांची चुकामूक होऊन तीं एका गिरीनिर्झरिणीच्या तीरीं एकटीच बसली असतां राणाजीस शोधणारी एक मोंगल सैन्याची तुकडी तेथें आली. त्या सैन्याचा अधिपति तिच्या सौंदर्यानें कामलोलुप झाला. तिनें त्या प्रसंगीं धैर्य धरून त्याची निर्भर्त्सना केली. तथापि तो विषयमूढ शुद्धीवर येईना. तेव्हां त्या साध्वीनें मागें मागें सरून त्यास न कळत एका कुंजाआड नेलें व तेथें त्यास एकदम खंजिरानें ठार केलें !

मंदाक्रांतावृत्त.

शरद्वर्णनः -

वर्षाकालीं कृषिजनमनोत्साहसंवार्धिणारी
होई लुप्ता नभि धनतती सिंचुनी शुद्ध वारी
कामीलोकां उपकृत करी योषिदालिंगनांनीं
वर्षा गेल्यावरि नव शरत्काल येई नटोनी ! १

शैलीं शैलीं रुचिर दिसती मुक्त तोयप्रपात
पक्षिश्रेणी तरुतरु--शिरीं गुंग गानोत्सवांत
क्षेत्रीं क्षेत्रीं हरिण--गण ते धावती संगतीनें
वाटे चित्तीं नव वसुमती हांसते मुग्धतेनें ! २

निर्झरिणीच्या तीरीं:-

कांठीं कांठीं कुसुमित--लता, वृक्षराजी वरून[१]
पात्रीं तैसें तलगत शिलाखंडही दृश्यमान
वाहे ऐसा धवल सलिलें ओघ कल्लोलिनीचा
आला कंठच्युत जणु महीं हार देवांगनेचा ! ३

गौरांगांच्या कुरळ अलकां आननीं सारणारा
संमोहानें वळुनि वळुनी तन्मुखें चुंबणारा
वाहे प्रातःसमयसुरभी पद्मनीखंड--वायू
बिंबोष्ठींचे शिथिल करितो कांतकंठस्थ बाहू ! ४

---

१ वरच्या भागावर.




तेथें बैसे अभिनवलता–तुल्य नेत्राभिरामा
ती पूर्वोक्ता नृपति–रमणी चारुनेत्रा ललामा [ पान २३ ]

विश्रामाचें स्थल गणुनि ज्यां सेविलें कुंजरांनीं
आनंदाचें गृह मधुकरां वाटती कुंज रानीं !
त्यांची ऐशी रुचिर विलसे पंक्ति पुष्पोद्गमानें
केली वेणी ग्रथित कुसुमीं कीं वनश्री सतानें ! ५

तेथें बैसे अभिनवलतातुल्य नेत्राभिरामा
ती पूर्वोक्ता नृपति--रमणी चारुनेत्रा ललामा
येती मोहें मधुकर मुखीं श्वासगंधानिलानें
घेवोनी ती कमल, कमला वारि त्यांना[१] तयानें ! ६

त्या भृंगांना कमल, मुख, हा भेद कांहीं कळे ना
वारायाच्या कमलमुखिच्या[२] सिद्धि ये ना श्रमांना !
वक्षीं किंचित् पदर सरला मात्र सीमंतिनीचा !
पृष्ठांगाशीं निवह रुळला कृष्ण धम्मिल्लिकेचा[३] ७

खिंडी खोरे कितिक फिरली, पाय गेले थकून
जीवाचा तो जिवलग कुठें तीस दावील कोण ?
होती तेथें रमवित मना देहविश्रांति घेत
ती सूर्येच्छू कमलिनि जणो होत होती प्रतीत ! ८

दोन्ही तीरीं तरु पसरले वल्लिका वेष्टिलेले
कांहीं कांहीं किरण शिरले पल्लवांतील जाळें

---

१ भृंगांना २ प्रतापरमणीच्या ३ केशकलाप.

कर्णीं पक्षिध्वनि 'कल कल' स्पष्ट तो येत होता
आपत्तीची भयद तिजला सूचना देत होता ! ९

वायू वाहे उलट, कितिदां सूचवि त्या सतीला
जाई बाले ! परत, इथुनी सत्वरीं आश्रमाला !
संकेताचा सरळ मतिला अर्थ कैसा कळेल ?
'होणारें जें विधिघटित तें केविं सांगा टळेल ?' १०

दिक्प्रांताचा दिसत नव्हता भाग झाडीमधूनी
झाडी डोले तइं गिरिशिरें येति कांहीं दिसूनी
पर्णांचा तो प्रतिरव तिला भावि भीतीस दावी
साधी भोळी हरिणि, तिजला कल्पना केविं यावी ? ११

मोंगल स्वारः—

ऐकूं येती तुरगचरणोद्भूत ते शब्द कानीं
शंकास्पृष्टा हरिणि बघते मान ती उंचवोनी !
पादोत्कीर्णा दिसत नव्हती धूलि आकाशगागीं
तीतें वाटे उगिच पडलें संशयीं मी अभागी ! १२

येतां येतां जवळि जवळी नाद आला हयांचा
तीरोपांतीं तृषित वळला संघ त्या सैनिकांचा
वर्णोच्चारें तिजसि कळलें स्वार हे मोगलांचे
शोधायाला अदय फिरती शत्रु जीवेश्वराचे ! १३

जावें कोठें कठिण समयीं काय आतां करावें
ऐशी भीती अवचित तिला वाटली स्त्री-स्वभावें
ये एकाकी कठिण घटिका गोंधळे धैर्यवान
ती जातीची अबळ अबला होय कंपायमान १४

जाळ्यामध्यें अवचित जशी सांपडावी कुरंगी
काकोलांना बघुन दचके कोकिला अंतरंगीं
कीं व्याघ्रांनीं परिवृत जशी धेनु कांपे थरारा
तैशा तीच्या उठति शरिरीं तत्क्षणीं घर्मधारा! १५

श्रीरामानें असुर सगळे नष्ट केले शरानें
ऐशा गोष्टी श्रवण करितों, वर्णितीही पुराणें
हे कोठोनी मग उपजले दैत्य तद्वंशभूत ?
ऐशी शंका मनिं उपजली, तीहि होती सयुक्त ! १६

अश्वाखालीं उतरुन तिथें देहविश्रांति घ्याया
स्वामी त्यांचा, तदनुचर ते पातले नीर प्याया
जैसा कृष्ण द्विरद पुढतीं, मागुनी यूथ त्याचा
ऐसा त्यांचा विधि गमतसे संप्रवेशावयाचा ! १७

मध्यें टोपी, वर भरजरी बांधिले भव्य फेटे
विंध्यारण्यासम पसरले केंस दाढींत वाटे !
ऊर्णायूंचें वसन शरिरीं उग्र तद्वर्ण काळा
व्योमांतूनी जलधर जणों पातले त्या स्थळाला ! १८

विक्राळांचे हयहि दिसती भव्य तैसे कराल
ज्याच्या त्याच्या कटिस दिसलें खड्ग, पाठीस ढाल !
अन्योन्याशीं वदत असतां शब्द येतात कानीं
भाषा त्यांची अपरिचित ती 'पुस्तु' किंवा 'पठाणी' १९

क्षोणींद्राची महिषि उठली, आवळी कृष्ण वेणी
कर्णी रत्नें तंव झळकलीं भूषणें ताम्रवर्णी
श्रोणीभागस्खलित रुचिरा मेखला सांवरोनी
आविर्भावें शरिरिं सजली चंडिका शूर राणी ! २०

कन्या वाटे जणुं तरणिची[1] त्र्यक्षरा[2] लोकमान्या
मान्यांनींही स्तवन करण्या योग्य संध्या वदान्या
धन्या कीर्ती बुधवर जिची गाति पावित्र्यजन्या
अन्यायी ते यवन कसली योग्यता होय त्यांना ? २१

विश्रब्धाक्षी मुख फिरवुनी शून्य दृष्टीस लावी
ना दृक्तेजें पतित शरिरें पावनीभूत व्हावीं.
जाऊं लागे मृदुलचरणीं मंद मंद क्रमानें
'प्यारी, ऐसा अरिवदनिंचा ऐकिला शद्ब तीनें[3] ! २२

विद्युद्वल्लीसम चमकली संमुखी होय काली
नीला कांती लपुन नयनीं ताम्रता तूर्ण आली

१ सूर्याची २ सूर्य कन्या गायित्री. ३ त्या प्रताप स्त्रीनें.

बिंबोष्ठीनें ललित अधरीं चावुनी दंश केला
भालेपांतीं भ्रुकुटिलहरी होत होत्या विलोला ! २३

यवनाधिपः--

"ज्याच्या शीर्षी विविध डुलतीं चामरें छत्र, त्यानें--
त्वत्प्रीतीचें अमृत मिळण्या नम्र व्हावें नृपानें
योषिद्रत्न त्यजिल न कुणी अप्रयत्नोपलब्ध"
बोले ऐसा अधिप; मशक ज्योतिला होय लुब्ध ! २४

"स्त्री जातीच्या सुरुचिर अशा भूषणा सोडणारा
रानोरानीं मज चुकवुनी जीव संरक्षणारा
योद्धा कैचा, अति पळपुटा नांव मात्र 'प्रताप'
त्याच्या संगें अजवरि तुवां भोगिला फार ताप ! २५

कांते ! जाते फुकट तव ही सुंदरा यौवनश्री
म्यां बोधावें तुजसि परि तूं अज्ञ सामान्य न स्त्री
हा जो शैलासम दिसतसे वीर एकेक येथें
तो सेवील प्रिय गुणवती सत्य तूझ्या वचातें ! २६

स्वस्फूर्तीनें सुचति उपमारम्य ज्यातें विचार
त्यांचें काव्यीं ग्रथन करण्या ज्यास साहित्य फार
सौंदर्यांगे ! दिसलिस न कां श्रेष्ठ ऐशा कवीतें ?
माझ्यापेक्षां करिल ललिते ! तो तुझ्या वर्णनातें : २७

मातें साधा पुरुष न गणीं, थोर आहें अमीर
संपत्तीचा मम सदनिं गे ! वाहतो नित्य पूर
मत्संसारीं फुलशिल जरी कल्पवल्लीसमान
मातें भूमीवर उतरला स्वर्ग वाटेल कां न ? २८

होतां खिन्न स्वमन तुजला एकदां गे ! पहावें
होतां चित्त क्षण विचल तैं कंठशब्द श्रवावे
होतां त्रास क्षणभर तुझ्या संनिधानीं रहावें
तीं तीं दुःखें हरतिल झणी यक्षिणी ! त्वप्रभावें !" २९

**प्रतापरमणीः--**

कामांधाच्या श्रवण करुनी स्वैर संभाषणातें
ती राहूच्या पुढति वितरी मोहिनी वाक्सुधेतें
"कोठें सिंह प्रबळ मम, तूं जंबुका क्षुद्र कोठें ?
कां मर्यादा त्यजुन करिशी, घातकी धाष्टर्य मोठें ? ३०

आत्मप्रौढी करित तुझिया सारखे वीर गेले
ना श्वानांच्या मुखिं चघळण्या हाड त्यांचें मिळालें
यद्वाहूच्या वरति विजयश्री सदा राजियेली
त्या सिंहाची प्रियतम सखी जंबुका वांछियेली ? ३१

सिंही सिंहा समुचित असे, ती न तैशी शृगाला
हंसी हंसा समुचित तशी, ती नसे वायसाला
हें सारेंही कळत असतां धृष्टता दाखवीशी ?
'कामी लोकीं बघति न कधीं पात्रतापात्रतेशीं' ३२

हें आर्येचें व्रत, पति जिथें तेथ जावें तियेनें
ती रानाला उपवन गणी नाथ--सत्संगतीनें
मोहीना तें स्वसुख तिजला सारिलें जें मतीनें
संपत्तीनें मन न चळतें भारिलें संस्कृतीनें ३३

मातें झाली सुचरित-फलप्राप्ति जन्मार्जिताची
भाग्यें झाल्यें जगिं सहचरी देशभक्तेश्वराची
तूं भ्रष्टात्मा, विषम करिशी बोध चित्तभ्रमानें
सारासारस्मृतिहि नुरते नीच कामांधतेनें ३४

जो 'अल्लाहो अकबर' अशा जागवी घोषणेस
तो ढोंगी, तूं कपटपटु कीं त्या गुरूचाच शिष्य
कापट्यानें हळुच गिळितां दीन एकेक मत्स्यी
या नक्राशीं जपुनिच रहा गांठ आहे जिवाशीं ! ३५.

'आह्मीं शौर्यें हतबल करूं अंगवंगादि देश
येथें आणूं, नमवुं चरणीं, काबुलाचा नरेश
जाऊं जेथें ह्मणशिल तिथें, जाउं ना त्या 'प्रतापीं'!
दिल्लीशाला विनति करिती वीर त्याचे प्रतापी ! ३६

दुर्दैवानें जरिहि घडली योजना याच देशीं
लावोनी ते बसति सदनीं हस्त भाळप्रदेशीं
आतां कैच्या घडतिल पुन्हां भेटि, या संशयांनीं
कांतापाशीं रडति यवनी संभ्रमालिंगनांनीं ! ३७

ऐसा ज्याचा त्रिपुरविजयी भव्य रुद्रावतार
संहाराया जणुं अवतरे पातकी भूमिभार
कीं राणाजी प्रियतम जगत्सिंह पार्थावतार
चामुंडेला निजभुजबळें अर्पिती मुंडहार ! ३८

यद्वाहूची समरपटुता देइ वीरांस मोद
आकाशीचे अमर करिती दुंदुभीचे निनाद
आश्चर्यानें स्तिमितनयना भ्रांतविक्रांतचित्ता
होती भीतिश्लथित अमरी युद्ध त्यांचें पहातां ! ३९

होताशी कां अतुल हळदीघाट–युद्धांत सांग ?
आयुष्याचा पळुन वद कीं वांचवीलास भाग ?
घायाळांच्या अजुन सुटल्या गेहिं नाहींत शय्या
वैधव्याच्या कुहरिं वद कां लोटिशी आत्मजाया ? ४०

जेव्हां हत्तीवर उसळला चैतकाचा लगामी
सेलीमाची तनु थरथरे, सांडिली युद्धभूमी
होतें कांहीं सुकृत पदरीं वांचला राजपुत्र
शाहा होता न तरि सदनीं पुत्रदुःखास पात्र ! ४१

जेव्हां बाहू मिरवित शिरे युद्धसारंगधीर
प्रत्येकाला प्रखर गमला प्राणहारी प्रहार !
एका सिंहावर अखिल जैं शस्त्रधारी मिळाले
राणाजीही रणचतुर तैं तीन वेळा उडाले ! ४२

धारातीर्थी इतुकि पडली प्रेतराशी मृतांची
कीं श्वानांना कितिक दिन ती मेजवानी तयांची !
रक्तक्षारें तृण न उगवे जाहले रुक्ष घाट
पूर्वालोभें वसति अजुनी वन्य तेथें विराट ! ४३

ऐसा क्लेशप्रद परजनां भूप संतप्तभानू
आत्मीयांना विधुसदृश, मी चंद्रिका काय वानूं !
आहे त्याची तुजहि विदिता धर्मवीरांगना ही
कष्टें केली सहन यवना बोलणीं तापदाई ! ४४

केली रूपस्तुति बहुत, मी ऐकिली कष्टतेनें
इच्छा नीच प्रगटिलि तुवां आत्मसंभावनेनें
वर्णीताती बहुगुण विषस्वार्थलोलुप पापी
"नाहीं सारें जगत फसणें शक्य भाषाकलापीं" ४५

ती वाणीनें मधु कलवती कोकिलाकंठरम्या
द्राक्षावेलीसम रसवती भावबोधावगम्या
किंवा मंजुध्वनिमय अशी सुंदरा देववीणा
कीं दिव्यार्थप्रसवि कविची बोधवाणी प्रवीणा ! ४६

होई स्तब्धा, अधिक न वदे जेविं आकाशवाणी
जाणोनी त्या अधम, शिणवी आणखी ती न वाणी
कोणालाही गमलि असती तद्वचांची शिराणी
आणीना तो विषयहृदयी एकही शब्द कानीं ४७

पाप्यास शिक्षाः-


' प्यारी ! प्यारी !' करित पुढतीं पातला कामचेष्टी
मागें मागें सरुन शिकवी ती सदाचार गोष्टी
गुंफेमार्गें न कळत तया नेइ ती पापियातें
घ्यावा अंतीं बलि ह्मणुन कीं कालिका ओढि त्यातें ! ४८

एका हातें खुणवुनि तया चंडिका धाक दावी
वस्त्राखालीं न कळत दुजा हस्त शस्त्रास लावी !
दृष्टी दृष्टीवरुन न चळे बोलतांना मुखानें
व्याघ्री भक्ष्यावर बघतसे उग्र अव्यग्रतेनें ४९

आयुष्याची भरलि घटिका तोंच दुर्बुद्धि होई
अग्निज्वालेवर मशक तो दुष्ट धावून जाई !
तों साध्वीचा कर उसळला केवळ प्राणहारी
खंजीरानें उलथुन झणी पाडिला पापचारी ५०

विद्युत्क्षोनें उमळुन महीं वृक्ष जैसा पडावा
कीं तोफेनें बुरुज वरचा खालतीं कोसळावा
कीं बंधारा तटनिसलिलें आदळावा धडाडा
' अल्ला ! अल्ला !' ह्मणत अवनीं पातला कामवेडा ! ५१

आक्रोशानें स्थल सकल तें जाहलें नादमग्न
चापल्यानें चपलमति तत्खड्ग घेई हिरून
रक्तस्रावें वसन भिजुनी पूर वाहात होता
पापाचारी मरणसमयीं आकळ्या देत होता ! ५२



॥ तों साध्वीचा कर उसळला केवळ प्राणहारी ॥

( पान ३२ )

## सर्ग ४ था.

मोगल सेनापतीस राणा प्रतापसिंहाच्या धर्मपत्नीनें ठार केल्या-नंतर त्याच्याच हातांतील तरवार घेऊन ती निर्झरणीच्या तीरावर इत-रांशीं युद्धकरण्यास सज्ज झाली. तिनें त्यांतील बहुतेक सैनिकांस रणतीर्थी निजऊन रजपूतवीरांगना हें नांव सार्थ केलें. इतक्यांत दुसरी टोळी आली. तिच्याशीं लढतां लढतां ती मूर्छित झाली. त्या सेनापतीनें तिला तशा विमूर्छ स्थितींत आपल्या घोडयावर घेऊन तो जयानंदानें परतला.

**वीरांगनेचा संग्रामः—** शार्दूलविक्रीडित.

तीरोत्तीर्ण उभी, जणो गिरिवरी ती दैत्यसंमर्दिनी !
अंतःशक्तिविलासिनी चमकली आकाशसौदामिनी !
किंवा येइ वसुंधरेंतुन गमे संतप्त ती नागिणी !
हाताची जहरी फणा उभविते ताम्रप्रभा लोचनीं ! १

देहीं होय उदार संगरवती भूलोकपालांगना
झाडींतून उफाळले करित ते योद्धे महागर्जना
तेव्हां भासति ते पयोधर, गमे ती त्यांत सौदामिनी
अद्रीचीं शिखरें, लता तरुविना कोणी न तत्प्रेक्षणीं २

जेव्हां कोषविमुक्त खड्ग भंवतीं नाचावया लागती
त्या ज्योतिष्मतिभोंवती उगवले कीं धूमकेतू अती
ढालेचा मिरवीत हात चपला[१] जेव्हां उडाली जवें
वाटे विश्वविलासिनी लढतसे अंबाच दैत्यासवें ३

---

१ प्रतापरमणी.

रक्ताचे उडती तुषार भंवतीं आरक्त झाल्या दिशा
धूळीच्या पटलांत सूर्य लपला नेत्रांस भासे निशा
तेथें युद्धचमत्कृतीस बघण्या जे देव आले नभीं
दृष्टीला नव्हते वरी दिसत ते त्या धूलिबद्धप्रभीं ४

मागें ठेवुनि एक पाय, पुढतीं देहास ती तोलुनी
घाली घाव शिरावरी उसळुनी आवेशपूर्णाननी
तद्देहस्फुटशोणितौघ वरतीं लागे उडूं जेधवां
देती वाट भटास देव गगनीं, स्वर्लोक सेवावया ५

आधीं कृष्ण, फिरून रक्त, पुढतीं झाली मही पांडुरा
अमूलाग्र विवर्ण वृक्ष दिसती, झाल्या दिशा भेसुरा
आकाशांतिल मेघमंडल गमे पृथ्वीवरी पातलें
ऐशी धूसरता तिथें पसरली संग्रामधूलीमुळें ६

एकाचें शिर तोडुनी भट दुजा लोकांतरीं पाठवी
कोणाचा मुरडून हात चुकवी कोणास घायाळवी
जेथें ती दिसली क्षणीं न दिसली गेली त्वरेनें कुठें ?
अश्वारूढ विपक्षियांस चुकवी, गावें किती शौर्य तें ७

झाला केश--कलाप मुक्त, तिजला शुद्धी न त्याची परी
झाला शोणितलिप्त देह, गमली ती कालिका भेसुरी
रक्ताचा परि एक बिंदु पडला नाहीं तिचा भूवरी
ऐशी ती अबला महाप्रबलही योध्यांप्रती नावरी ८




मेवाडी रजपूत संगरकलावेत्ते जसे निग्रही ॥
कांताही समर-प्रतापचतुरस ये शत्रुच्या प्रत्ययीं ॥ (पान. ३५)

कोणी ओरडती, कुणी क्षितितळीं घायाळ आक्रोशती
अस्ताव्यस्त रणांगणांत पडलीं प्रेतें भटांचीं किती
कोणी दुःखभरांत धैर्य धरुनी चालावयां लागती
होती एकच दुःखमुक्त ललना ती मात्र तेजोन्वती ! ९

दुष्टाच्या करिं राहुनी प्रतिदिनीं जें सज्जना कांपवी
राजस्थाननृपाळधर्मललना खड्गास त्या नाचवी
शोभे खड्ग तिचें प्रदीप्तकिरणीं विद्युत्प्रभेच्यापरी
कीं ती इंद्रधनुःप्रभा पसरली संग्रामभागावरी १०

सिंधूची लहरी विलास करिते जैशी तटोपांति ती
पाषाणावलि विद्रवून उसळे ज्वाला ज्वलत्पर्वतीं
तैशी विक्रमशालिनी नृपसखी उत्साहसंवर्धिनी
देवी दैत्यविदारिणी विलसली स्वातंत्र्य–युद्धांगणीं ११

मेवाडी रजपूत संगरकलावेत्ते जसे निग्रही
कांताही समरप्रतापचतुरा ये शत्रुच्या प्रत्ययीं
केला देश विमुक्त कष्ट सहुनी दास्यांतुनी सर्वथा
त्यांच्या हर्षुनि हर्षुनि कवि बहु गाती यशाच्या कथा १२

सूर्यानें मुख झांकिलें घनपटीं त्या[१] चंडिकादर्शनीं
चंद्राचें तर नांवही न उरलें कोठें नभःप्रांगणीं !

---

१ त्या क्रुद्ध प्रतापरमणीस.

संध्या आणि उषा दिगंति दडल्या त्या भैरवीच्या भयें
रक्ताच्या सरितेंत रक्त कमला[1] खेळे गजांच्या सवें १३

आकाशीं किति मांस खंड उडती खड्गप्रहारांतरीं
त्यांतें भक्षिति गृध्र वायस किती संग्रामभूमीवरी
वाटे कीं रवितांम्रगोल फुटला तत्खंड हे पातले !
देवांच्या नयनद्वयांतिल जलें कीं आर्द्रता पावले १४

शीर्षच्छिन्न कलेवरेंहि पडलीं तेथें हयांचीं किती
त्याखालीं चिरडून वीर पडले नाहीं तयांची मिती
कोणी पादविहीन, भग्नकर वा विच्छिन्न कोणी पडे
ईशध्याननिमग्न वीर निघती आकाशमार्गाकडे १५

कोणाचे पदहीन देह पडती देहीं कुणाच्या तरी
कोणाचे करहीन देह दडती जाऊन वृक्षांतरीं
कंठीं कंठ कितीक ठेउन महानिद्रावशी जाहले
होते जे उरले तदायु गमलें संपेल कीं संपलें ! १६

होती संनिकटी तरंगिणि तरी पाणी तिचें प्यावया
कोणीही न तृषार्त वीर शकला तेथें स्वयें जावया
'पाणी पाणि' करून जीव सुकले; तोंडें कितीं वासलीं
पाण्याचा नच थेंब, रक्त वदनीं, ऐशी गती जाहली १७

---

१ प्रतापरमणी.

पुष्पांच्या शयनावरी सुखभरें जीं झोंपली मंचकीं
युद्धीं घर्मजलें तदीय भिजली आंगांतली कंचुकी
घालाया प्रियकंठहार सजले जे हस्त शय्येवरी
त्या हस्तें अतुल प्रताप समरीं दावी जगत्सुंदरी १८

वृक्षांच्या शिखरावरी विहरती जे पक्षि मंजुस्वरीं
पंखांनीं तनु आवळोनि बसले भीतीमुळें कोटरीं
झाले स्तब्ध, न शब्द काढिति मुखीं भेसूरता पाहुनी
" मोठ्यांच्या कलहीं लहान बसती देहास संरक्षुनी १९

पृथ्वीच्या प्रळयांत सूर्यकिरणीं आरक्त मोठे गिरी
स्थानभ्रष्ट इतस्ततां भटकती सिंधुप्रवाहावरी
मागें आणि पुढें तसे चहुंकडे सक्रोध जे धांवती
नेत्रानंदिनि ती प्रतापलहरी सारी तयांना सती २०

ज्याची पत्नि धुरंधरा बलवती सत्क्षात्रकर्मोचिता
भर्ता विक्रमकीर्तिवंत न कळे कैसा असेल स्वतां
त्यांशीं गांठ रणांगणांत पडतां होईल कैशी दशा ?
भीतांच्या हृदयांत यापरि शिरे उद्विग्नतेची निशा २१

'दैवानें जगतील, येतिल पती खैरात वाटूं जनीं
बोलूं शांतपणें विलासभवनीं कंठास आलिंगुनी'
गेहीं त्या यवनीस हें श्रुत न कीं 'संसार आटोपला' !
'चिंती मानस एक, अन्य घडतें दुष्कर्म येतें फळा' २२

विश्रांती मृदुलेस त्या पळभरी लाधे न युद्धांगणीं
जीवाचें नव्हतें कुणी, कळवळा यावा कुणाच्या मनीं
व्योमीं विद्रुत मेघखंड करिते जैशी मरुद्वीचि तीं
थोडेसे उरले, असंख्य पडले झाली अशी तद्गती २३

मोठे पर्वत टाकिले उलथुनी, यांची कथा काय ती
सारा सागर पोहिला, नच तिला खाड्यांत[१] वाटे क्षिती
शक्तीचा अवशेष एकवटुनी धावे महा योधिनी[२]
भामा[२] शस्त्रकरास तीव्र मिरवी दुष्टांस संमर्दुनी २४

हा ! हा ! काय परंतु सैन्य दुसरें आलें कुठोनी रणीं ?
मेलेले उठले पुन्हा अहि—मही वाटे मनीं त्याक्षणीं
दुष्टांना चढलें रणस्फुरण, तों धैर्योत्तमा कांपली
तेव्हां मात्र सती हताश हृदयीं चिंताज्वरें भाजली २५

“ हे प्राणेश्वर ! लोकपाळ वससी अज्ञात जागीं कुठें
दासीची तव दर्शनाविषयिंची आशाच आतां खुटे
ये ये धांवुन संकटांत समयीं संग्रामचूडामणी !
सिंहाची रमणी वृका न सुलभा, दे प्रत्यया आणुनी २६

वैडूर्यप्रभ पुच्छभार अपुला झांकोनिया बर्हिणी
आलेल्या असतील संकट--कथा सांगावयालागुनी

---

१ सरोवर २ प्रतापरमणी.

त्यांचे जे गळतील बिंदु नयनीं त्यांतें तरी पाहुनी
येथें फोडित गर्जना लवकरी यावें तुवां धांवुनी २७

उल्लासस्फुरिताधरा द्रुतगती येतील सारंगिणी
झाल्या विद्रुत येथुनी तुजपुढें सांगावया काहणी
दासी दारुण संकटांत पडली ऐसें मनीं जाणुनी
त्यांच्या पादपथावरून चतुरा! ये! ये सख्या! धांवुनी २८

चिंतास्पृष्ट विषादयुक्त शकुनें होतील तूंतें प्रिया!
डावा नेत्र पुनः पुन्हां विचलतां होशील शंकी सया!
भीतिग्रस्त तदा विहंगगण जी येई दिशा सोडुनी
काळाचें प्रतिरूप घेत इकडे यावें तुवां धांवुनी २९

वायूच्या लहरींतली तुज जरी भाषा कळोनी न ये
धूळीचे दिसले न लोळ तरि कां पृथ्वीपते! भव्य हे
एखाद्या कुहरीं निमग्न असशी कीं अन्य तूं चिंतनीं
दैवाचें मजला न दुःख चुकतें हें भोगल्यावांचुनी ३०

होवो होइल काय तें भय नसे माझें मला सर्वथा
शूरांची प्रमदा मरेल अथवा मारील हें नान्यथा
माझें ऐकुनिया अनिष्ट तुजला वाटेल काय प्रिया!
त्वद्वज्रोपमही फुटेल हृदय प्राणेश्वरा! राजया! ३१

माझें प्रेत बघून त्यावर सख्या! बाष्पांस गाळूं नको
मन्मोहें निजदेश–कार्य करण्या संमूढ होऊं नको

दास्यापासुन देश मुक्त करणें, हें ब्रीद सांभाळणें
कर्तव्याविण सर्व सूज्ञ वदती धिक् मानवाचें जिणें "३२

वृक्षांच्या शरिरास कंप सुटला जों वायु उच्छ्वासला
पक्षिश्वापदघोष होय भवतीं दिक्प्रांत नादावला
आला काय सखा वळून बघते मार्गे मृगाक्षी पुन्हां
आशाबद्ध मनास संभ्रमवि ती उत्कंठिता कामना ३३

"तू येतां रणसज्ज खड्गधृतवान् सामंतचूडामणी !
शौर्यश्रीभुजदंडमंडित असा कोदंड वा घेउनी
शेषाचें शिर हालुनी वसुमती कांपेल ही त्वद्भयें
मेरूचीं शिखरें प्रकंपित तशीं ! होतील तीं निश्चयें ३४

क्रूरांचा जमला जरी कळप हा शार्दूल तूं राजया !
कंठच्छेदन रक्तशोषण तुला ह्या ज्ञात युद्धक्रिया
हे शक्तिप्रबला ! खरीच अबला झाल्यें, लढूं मी कशी ?
झाली हस्तगता प्रतापरमणी दुष्कीर्ति ना हो अशी ३५

अंतः क्लेशवतीस ती घडि अशी आली मनःकंपदा
दुःशब्दें अपमानभूत परिसे ती आत्मनिंदा तदा
दृष्टिक्षेप करी सभोंवति बघे सेनाब्धिला एकटी
"मातोश्री ! जय अंबिके ! म्हणुनिया घाली उडी शेवटीं" ३६

हंसी पक्षबलें पुढें सरकली काकोलही धांवले
मृद्वंगीस करीत दंश सुटले संघैक्यशक्तीमुळें

रक्तस्त्राव घडून शक्ति सरली, तों घाव आला शिरीं
झाली शक्तिहता विमूर्च्छ पडली धारांगणीं सुंदरी ३७

जाईची लतिका धरेवरि पडे तों दुष्ट आनंदले
सेनेच्या अधिपास धन्य विजयीं चित्तीं किती वाटलें
घेई बंधुन आपुल्याच तुरगीं मेवाडमातेश्वरी
अस्तव्यस्त शरीर होय, अदयां आली दया ना तरी ३८

होती दर्शनदुर्लभा तनु जिची सामान्यलोकां जनीं
सौधोत्संगिं शशीस मात्र दिसली तत्तुल्यशोभाननीं
आर्येची करिती अनार्य विजनीं आबाळ ना पाहवे
राजा रंक असो, प्रसंग कसला येईल ना सांगवें ३९

ज्या वेणविर पद्मपुष्प बघुनी भृंगे सदा धांवती
देवांच्या सखि यत्कलाप बघुनी तैसा करूं पाहती
लोळे त्रस्त अहा! तुरंगमपदीं तो तीव्र वेगामुळें
घेती ब्रर्हिणि बर्हभार अपुला झांकून भीतीमुळें ४०

साध्वीच्या रुधिरांत दिव्य इतुकी कीं शुद्धता बाणली
नाथावीण दिनेशरश्मि शिवतां त्या कृष्णता पातली
होतें शुद्धचि तें, 'अशुद्ध' ठरलें सूर्यापकृत्यामुळें
एकाची कृति दूषणीय, दुसरा कां निंद्य हें ना कळे ४१

शोभावी जिचिया उरोजकलशीं मंदारपुष्पावली
वायूनें सरतां दुकूल, उडते त्या धूलि वक्षस्थलीं!

'बिंबोष्ठी' तिजला विशेषण मिळे ज्या ओष्ठयवर्णावरी
ते वाळून विवर्ण आज दिसती शुष्क प्रवालापरी ४२

मूर्छा--मीलितनेत्र ती कमलिनी सुप्ता गमे योगिनी
कांतिक्षीण कलावशेष गमली बालेंदुमंदाननी
नेई मोहिनि राहु कीं अमरही आले न रक्षावया !
ज्याचा तोच असे विपत्तिसमयीं आपत्ती भोगावया ४३

जातांना पतिमागुनी निरखिली ज्यांनीं मनोहारिणी
आशिर्वाद दिले सुखी पुनरपी येवो प्रजानंदिनी
दुःखानें वनदेवता किसलयीं नेत्राश्रु त्या गाळिती
सत्पुष्पाभरणें लता त्यजुनिया खिन्नाननें बैसती ४४

---

## सर्ग ५ वा.

आपली धर्मपत्नी असहाय स्थितींत मोंगलाशीं लढली, शेवटीं तिला विमूर्च्छ स्थितींत मोंगल घेऊन चालले. ही वार्ता प्रतापास कळतांच तो अरवली पर्वतांतून भिल्लांचें सैन्य घेऊन गर्जना करीत मोंगल सैन्यामागें लागला. वाटेंत त्याच्या धर्मपत्नीनें केलेल्या युद्धाचा भीषण देखावा त्यानें पाहिला. त्यामुळें तर त्याच्या रक्ताला उसळी आली. पुढें मोंगलाबरोबर त्याचें तुंबळ युद्ध झालें. ज्या मोंगलनिशाणा-जवळ प्रतापाची धर्मललना मूर्च्छित स्थितींत पडली होती त्या निशाणाचे तणावे कापून त्यानें तो शत्रूचा ध्वज लाथेनें उलथून पाडिला ! तेव्हां तेथें भीषण रणकंदन झालें. राणा प्रताप आपल्या अर्धांगीजवळ आला. त्यानें तिचें शीर्ष आपल्या मांडीवर घेतलें. तिचें रक्त पुसिलें. तिनें डोळे

उघडून त्या प्राणेश्वरास पाहिलें व पुन्हां नेत्र झांकले! राणाजीनें तिला एका पालखींत घालून तिच्या सुश्रुषेची व्यवस्था केली व तो पुन्हां रिपुकंदनास लागला सर्व मोंगल सैन्याची वाताहत झाली. व राणा-प्रताप यास विजय प्राप्त झाला.

( वसंततिलका. )

**राणाप्रतापः-**

नेली प्रतापरमणी नव चारुगात्री
ना पाहवे अरवली गिरिला स्वनेत्रीं
ऐशी करी हृदयकंपद गर्जना तो
कीं भूमिकंप म्हणती जन काय होतो? १

निद्रिस्त वन्यमृग जागृत तैं जहाले
वृक्षावरील खग ते सगळे पळाले
होई विकंपित मरुल्लहरी-विलास
तोयप्रपात मुकले सरला गतीस २

चिंताकुला अखिल मोंगलवीरसेना
पाहे पराङ्मुखवती भयवेपमाना[१]
हा! हा प्रताप रणकेसरि काय आला!
घालील हा यम जिवाववरि आज घाला ३

पाठीस--भिल्ल शबरान्वित उग्र सैन्य
हातांत भव्य नव चर्म तसा कृपाण

१ भयानें कापणारी.

उल्लंघितो विषम मार्ग गिरीगुहांचे
हारील तेज अमुच्या विजयी मुखाचें ४

प्रक्षुब्ध वारिधर त्यापरि वेगधारी
क्रोधें पुनः पुनरपी रण--घोषकारी
जों जों समीप दिसला खलवृंद--शास्ता
तों तों उरांत धडकी भरली समस्तां ५

तीरावरील रमणीकृत युद्धचिन्हें
पाहे सबाष्प नयनीं नृप संभ्रमानें
"तूं! धन्य वीरललने! असहाय कालीं
मांसास्थिशोणितयुता रणभूमि केली! ६

तूं जाहली असशिल श्रमिता स्वदेहीं
मन्मार्ग तूं निरखिला असशील देवी!
आकाश फाडुनि विदारुनि पर्वताला
आलों न घोर समयीं, विधियोगलीला! ७

कुंदोज्ज्वला समरसिंजितरक्तकांता
मूर्च्छान्विता नयनमीलितवृत्ति शांता
संग्रामधूलिमलिना रिपुपाशबद्धा
मी धांवलों परिसुनी तव घोर वार्ता" ८

घनघोरयुद्धः-

युद्धार्थ कार्मुक--गुणीं शर योजणारा
दिव्य प्रभाव मिरवूं मनिं इच्छिणारा




प्रक्षुब्ध वारिधर त्यापरि वेगधारी ।
क्रोधें पुन: पुनरपि प्रतिघोषकारी ॥ (पा.४४)

उद्दीप्त कोपदहनीं रिपु जाळणारा
घेऊन सैनिक--समूह निघे पुढारा ९

चित्तास चाप--परुषध्वनि भीति देई
बाणप्रबंधनिकरीं रवि लुप्त होई
स्वर्लोकदेवयुवती म्हणती " अगाई !--
हा क्षात्रधर्म विषमाचरणीय बाई ! " १०

सामर्थ्यहीन यवनी पृतनेसमीप
गेला त्वरें रणविशारद जों प्रताप
" श्री एकलिंग ! जयशंकर ! " शब्दघोष
मेघासमान गमला रिपुमानसास ११

भाल्यांतुनी शर कदा निघती कळेना
चापीं नियोजिति कसे दिसतें न कोणा
चाप--त्रिकोण दिसले श्रवणांतकृष्ट
व्योमोदरांत उठले शरजाल कष्ट १२

एकेक बाण हरितो रिपु दोन तीन
प्राणांत शीघ्र करिती शर वेगवान
मागून तेहि रिपुशोणित--रक्तदेही
जाती बुडून समरीं रुधिर--प्रवाहीं १३

ओढून ओढुन धनुर्गुण तैं भटांच्या
अंगुष्ठ--तर्जनि अहा ! फुटल्या करांच्या

वीरार्थ जीं उतरलीं समरीं विमानें
त्यांची कशी कवि करी गणना मुखानें १४

होवो किती श्रम तयासहि साहणारा
भूपार्थ आत्मतनुला तृण मानणारा
रुद्रावतार गमला प्रति सैनिकाचा
शिंपी सडाच समरीं अरि-शोणिताचा १५

मागें न पाय फिरला पुढचा कदापि
राणा प्रताप तर तो अतुलप्रतापी !
स्वर्गांतले पितर तुष्ट करीत होता
देवांचिया हृदयिं हर्ष भरीत होता १६

ढालेवरी खटखटा बसती प्रहार
तो पेटला हटतटासाचि वीरभार
आरंभिला खणखणाट अशा परीचा
कर्णीं न ये कलकलाट महद्रिपूंचा १७

ते सर्वही महिष, हा बलिदानकारी
चंडीस तुष्ट करण्यास्तव त्यां विदारी
घातासवें उडति मस्तक-कंदुकें तीं
वर्षाऋतूपरि घडे रुधिरांबुवृष्टि १८

स्वर्गांत काय सुर--दानव झुंजतात ?
तेथून कां पतन सैनिक पावतात ?

झाली प्रदीप्त दहनासम युद्धभूमी
कित्येक वीर पडती रणकुंडहोमीं १९.

युद्धोन्मदांत लढतां लढतां जयांचें
गेलें उडून शिर, उग्र कबंध नाचे
राशीवरी पडति राशि कलेवरांच्या
ढाला रणीं न फिरल्या तरि मोगलांच्या ! २०

योद्धे अमीर उमराव पठान खान
ईर्षेंत वीर चढले, भिडले कृपाण
हुंकार देत लढती सरती न मागें
थोडेंहि मृत्युभय यत्हृदयीं न वागे २१

खालून घाव बसतां वरतीं उडावें
येतां प्रहार वरुनी चुकवून जावें
छातीस छाति भिडली तरि छातिचे ते
वीराग्रणी अरिवधास्तव सिद्ध होते २२

एकें दुज्यास धरणीवर लोळवावें !
त्याला कुणी उदर रोंखुन भोसकावें !
दिल्ली कुठें अरवलीगिरि-भूमि ! कोठें
ती जन्मभूमि, मरणस्थल हाय ! कोठें ! २३

सिंहावलोकन करी नृपराज जेव्हां
होई प्रकंपित मनीं दळभार तेव्हां

तो सोक्षमोक्ष करण्यास्तव शक्ति-धीर
' घे घे ' करीत सुटला समरज्ञ वीर २४

केतूस तो अनुसरे प्रळयांतकारी
जेथें स्वकीय ललना विकलांगधारी
कोलाहल प्रबल होय धुरंधरांचा
तेथें समूह जमला विजयी भटांचा २५

झांकून मेघपटलीं रवि जाय जैसा
संशप्तकांत नर अर्जुन मग्न जैसा
चोहींकडून वळले यवन प्रतापी
वज्रांग धैर्यधर त्या अतुल प्रतापीं २६

प्रतापरमणी:—

होता असा चपल पेलित खड्ग--हस्त
केले तटस्थ भंवतीं रिपु ते समस्त
आला ध्वजाजवळ यापरि झुंज देतां
तों देखिली दुरुन बद्धवती स्वकांता २७

ती कामधेनु नडली पडली अकालीं
कांट्यांत काय सुकली सुकली चमेली !
पाहे सभोंवति सती उघडोनि डोळे
तों तीस नाथ दिसला, मन शांत झालें २८

"हे प्राणनाथ !--" विदुला वदण्यास पाही
तों कंठ सद्गदित होउन बाष्प वाही
क्षीण स्वहस्त अचला उचलूं पहाते
थोडा उठून पडतो धरणीतळातें ! २९

कर्णाकडे नयनबिंदु वहात जाती
दुःखध्वनी उमटती जरि आवरी ती
विस्रब्ध रक्त फुटलें तनुचालनेनें
ग्लानींत नेत्र मिटले श्रमिताननेनें ३०

जी शोचनीय गति पाहुन कींव यावी
ती कोमला, कशि तिनें शरिरीं सहावी ?
जैं केतकी निरखिली अहिपाशबद्धा
क्रोधानलें भडकला रजपूत योद्धा ३१

प्रेमी जनास अतिदुर्धर संकटांत
पाहूं शके कवण विक्रमशक्तिवंत
सर्वांस भूप गमला अनिवारणीय
दावानल प्रशमवूं शकतील कोण ? ३२

प्रतापाचा तुमुलसंग्रामः-

जेथें गळेल विभुशोणितबिंदु साचा
देतील तेथ बळी जे अपुल्या तनूचा
संरक्षणास शबरोत्तम धांवले ते
भूपस्वरूप अपुल्या प्रिय दैवतांतें ३३

ढालेस ढाल भिडली उठली धुमाळी
राष्ट्रध्वजापुढति भीषण झुंज झाली
मेवाडलक्ष्मि--निटिलीं विधिलेख काय ?
हा प्रश्न तेथ सुटणार निशंकनीय ३४

भीष्मप्रतिज्ञ कुलकीर्ति विवर्धिणारा
धारांगणीं रुधिरबिंदु समर्पिणारा
स्वर्गापगाजल--महौघ असा पुढारी
वृक्षासमान करि कंपित सर्व वैरी ३५

वायूच तो कदलिकाननाशकारी
कीं मत्त कुंजर लतातरुवृंदहारी
केले अनंत शकलीकृत देहवंत
तो मूर्तिमंत गमला सकलां कृतांत ३६

कोणी म्हणे प्रकट हा मदनांतकारी
कोणी म्हणे कुपित हा गमतो मुरारी
वाटे परंतु कविला रणयज्ञकुंड
घेतां नराहुति झणीं भडके प्रचंड ३७

" काबूल काश्मिर पिशावर हिंडुनिया
आलों कशास इकडे यश घालवाया
चित्तीं असा प्रकटिती अनुताप वैरी
दुर्दैव तें छळितसे मनुजास भारी ३८

भूषवीति अलकावती गृहें
तारका बघति अंबरीं स्पृहें ७

" थांब, येतिल अतांच ते घरीं
बाळ! घेतिल तुला कडेवरी "
तातदर्शनसुखेच्छुबालकां
बोलताति मृदु बोल मातृका ८

ज्योत्स्ना वर्णनः—

अंबरीं तरणि--दीप लोपला
अंधकार रिपु मत्त जाहला
प्राक्दिशेस दिसतां निशाकर
सेविते तिमिर अद्रिकूहर ९

चंद्रशीतकिरणीं वसुंधरा
शांत शांत गमली मनोहरा
कौमुदी धवल वस्त्र नेसली
कामिनीसदृश रात्र वाटली १०

ह्या विशाल सुरमंदिरावर
शुभ्र जें छत दिलें मनोहर
तें सुटून पडलें महीतळीं
चंद्रिका धवल तेंवि भासली ११

ढालेस ढाल भिडली उठली धुमाळी
राष्ट्रध्वजापुढति भीषण झुंज झाली
मेवाडलक्ष्मि—निटिलीं विधिलेख काय ?
हा प्रश्न तेथ सुटणार निशंकनीय ३४

भीष्मप्रतिज्ञ कुलकीर्ति विवर्धिणारा
धारांगणीं रुधिरबिंदु समर्पिणारा
स्वर्गापगाजल--महौघ असा पुढारी
वृक्षासमान करि कंपित सर्व वैरी ३५

वायूच तो कदलिकाननाशकारी
कीं मत्त कुंजर लतातरुवृंदहारी
केले अनंत शकलीकृत देहवंत
तो मूर्तिमंत गमला सकलां कृतांत ३६

कोणी म्हणे प्रकट हा मदनांतकारी
कोणी म्हणे कुपित हा गमतो मुरारी
वाटे परंतु कविला रणयज्ञकुंड
घेतां नराहुति झणीं भडके प्रचंड ३७

" काबूल काश्मिर पिशावर हिंडुनिया
आलों कशास इकडे यश घालवाया
चित्तीं असा प्रकटिती अनुताप वैरी
दुर्दैव तें छळितसे मनुजास भारी ३८




" तो मूर्तिमंत गमला सकलां कृतांत "

( पान ५० )

दा. क्र. ४२५०

शस्त्राभिघातपटु तो चिरितो तणावे
पादप्रहार करण्या उसळून धावे !
भूमिस्थळीं उलथला ध्वज मोगलांचा
जीवांत जीव नुरला पळल्या जनांचा ३९

कल्लोल फार उठला, फुटला समूह
प्रत्येक वीर वदला ' प्रभु धाव धाव '
दे माय हाय धरणी ! शरिरास ठाव
हा एक मात्र उरला हृदयांत भाव ४०

शेळ्या जणो यवन, ते वृक भिल्ल मागें
हा ! हा ! करीत पडती, पळती प्रवेगें
विम्लान वीर, समरीं हतवीर्य झाले
थोडेच मात्र उरले बहुतेक मेले ४१

मेवाडभूपतिसवें यवनाधिपाचा
संग्राम अद्भुत घडे बलसागरांचा
अन्योन्य तीव्र करिती असिघात शीर्षीं
मेघासमान गमले रुधिरांबुवर्षी ४२

जों वीरवंशज रिपूवर घाव घाली
वृक्षासमान पडला उलथून खालीं
आयुष्य काढिति किती पळ एक एक
एका क्षणांत वरिती मृतिला कितीक ४३

दोर्दंड--शत्रुबलहारक भीमतुल्य
यन्मानसांत महिषीनवदु:ख--शल्य
स्वांकीं तिचें शिर करीं उचलून घेई
हस्तें पुशी रुधिर बोलुन धीर देई ! ४४

जों नाथहस्त शिवला तनु कोमलेला
पाही तदा कमलिनी उघडोनि डोळा.
मर्यादशील युवती उठण्यास पाही
राणा प्रताप वदला ' श्रम हे न वाहीं ' ४५

सोडी स्वकीय कटिबद्ध अमोल शेला
भूपें व्रणावर करें दृढ बांधियेला
दासांकडून नववाहानिका करून
तीतें मधें बसविली तनु सांवरून ४६

बोलावयास नव्हती अभियुक्त वेळ
जो जाय तो पळ गमे हृदयीं अमोल
दिल्लीस एक न कुणी परतून जावो
भाग्योदयास शुभदायक काल होवो ४७

व्यापी दिशांस जयसूचक वाद्यघोष
प्रत्येक वीरवर गर्जतसे सहर्ष
ऐशा चमूसह उदङ्मुख होउनीया
तो चालला नृप पुन्हां अरि संहराया ४८

जोडून हात शरणागत सर्व येती
जाणे नृपाळ शरणागत -युद्धनीती
मेले किती खल मदोद्धत दुःस्वभावें
कीं मृत्तिकाघट शिलेवरती फुटावें ४९

---

## सर्ग ६ वा.

मोंगलांचा पराभव केल्यानंतर विजयी प्रतापानें जवळच्याच एका गांवीं आपल्या सैन्याचा तळ दिला. तो गांव त्याच्याच हद्दींतील होता. गांवांतील लोकांना आनंद झाला. ते राजदर्शनास गेले. गांवांतील कुलीन स्त्रियांही राणीस भेटल्या. त्यांनीं आपल्या प्रभूची चांगली व्यवस्था ठेविली. राणीची प्रकृति चांगली होईपर्यंत तेथेंच राहण्याविषयीं त्यांनीं राणाजीस आग्रह केला. पण ही वेळ किती महत्वाची आहे हें प्रतापानें समजावून सांगितलें. नंतर ते लोकही शस्त्रास्त्रें घेऊन प्रतापाचे सैनिक बनले. ठिकठिकाणीं मोंगलांचा पराभव करून राणा प्रतापानें मेवाड देश स्वतंत्र केला. व आपल्या उदेपूर राजधानींत पराक्रमार्जित सिंहासनावर तो अधिष्ठित झाला.

( रथोद्धता. )

**सायंकाल वर्णनः-**

श्रीसहस्रकर अस्तपर्वतीं
घेइ दिग्विजयशांति संप्रतीं
पश्चिमा मधुर हास्य दावितें
कांति तीच अरुणा विराजते १

शृंगराजाशिखरीं रविप्रभा
हेमसानु दिसतो जणो उभा

पक्षिजाति वळती गृहाप्रति
रम्य पंक्ति गगनांत शोभती २

सेविती जलद रक्तवर्णता
अंबरीं विलसली मनोज्ञता
अंबर प्रतिनिशेस रेखितो
चित्रवार न दिसे कुणास तो ३

पद्मकोषगत षट्पदावली
सेवुनी मधु न तृप्त जाहली
पद्मबद्ध अलि एक जाहला
हा जनांत अति लोभ निंदिला ४

चालतां मृग वळून पाहती
मागुनी हरिणबाल धांवती
उंच कर्ण भयवृत्ति दाविती
थांबुनी द्रुतगतींत धांवती ५

क्षेत्रकर्मरत लोक संप्रतीं
मंद मंद वळती गृहाप्रती
शांत विश्रमित तन्मनस्थिति
कार्यसिद्धि हरिते श्रमाप्रती ६

बालकुंतल हळूच सारिती
नाथमार्ग युवती निरीक्षिती

भूषवीति अलकावती गृहें
तारका बघति अंबरीं स्पृहें ७

" थांब, येतिल अतांच ते घरीं
बाळ ! घेतिल तुला कडेवरी "
तातदर्शनसुखेच्छुबालकां
बोलताति मृदु बोल मातृका ८

ज्योत्स्ना वर्णनः—

अंबरीं तरणि--दीप लोपला
अंधकार रिपु मत्त जाहला
प्राक्दिशेस दिसतां निशाकर
सेवित तिमिर अद्रिकूहर ९.

चंद्रशीतकिरणीं वसुंधरा
शांत शांत गमली मनोहरा
कौमुदी धवल वस्त्र नेसली
कामिनीसदृश रात्र वाटली १०

त्या विशाल सुरमंदिरावर
शुभ्र जें छत दिलें मनोहर
तें सुटून पडलें महीतळीं
चंद्रिका धवल तेंवि भासली ११

जान्हवी सगरबालसंस्तुता
शुभ्र शीकरजलौघसंयुता
नित्य नित्य ' जय '-- शद्बनादिनी
होय काय मरुभूप्रवाहिनी ? १२

यक्ष किन्नर निसर्ग--गायक
गाति जी विबुधकीर्ति भाविक
ओघ काय वळला तिचा अहा !
स्वर्गवाक्ष गमतो शशांक हा १३

विष्णुकंठमणि मुक्त जाहला
स्वर्नदींत पतनास पावला
तोच हा विधु विलोल भासतो
शांत तेज वितरीत डोलतो १४

हांसती, कुमुदिनी विकासती
भोंवती प्रियचकोर—राजती
एकभावचि जिथें विराजतो
प्रीतिसंगम विलोभनीय तो १५

संगरश्रमविनीत व्हावया
चंद्रिकेस चमु सेविते तया
ग्राम जें निकट, लोक तेथले
राजदर्शनसुखार्थ पातले १६

नृपातिथ्यः-

खड्ग बांधुनि कटीस वांकडें
राव ठाकुर निघे नृपाकडे
एक एक करि वंदन--क्रिया
तोहि पार्थिव समाश्वशी तथा १७

ती प्रतापरमणी शुभंकरी--
नाथकंठ--विलग्न सुंदरी
दुःखताप विकलांगना निशीं-
निद्रिता नच विबोधिता अशी. १८

भेटण्यास तिजला कुलांगना--
पातल्या हृदयशुद्धकामना
वंदिती विविधवस्त्रधारिणी
आदरें बसवि त्यांस राजिनी १९

भोज्य वस्तु जन अर्पितात जे--
आणखी पुसति ' काय पाहिजे ? '
राजनिष्ठ वदती मुखें अहा !
राजयोग घडला अह्मांस हा. २०

प्रार्थिती जन वितारितांजली
देवि होय गत-दुःख ही भली

तोंवरी वसति येथ पावणें
ही प्रजा--विनति योग्य सेवणें २१

धूर्जटीनवशशीकलावती
वेदनाक्रमवती कृशांगि ती
पारिजातकुसुमावती सती
केवि साहिल पथश्रम संगतीं ! २२

तो वदेः– "उदयकाळ बोलवी
प्रीतियोग तुमचा विमोहवी
राजभक्ति वितरी पवित्रता
ओढ लावि मजला स्वतंत्रता २३

धर्मपत्नि बहु कष्ट साहते
जन्मभूमि परि साश्रु बाहते
देशकार्य करितां जगीं खरें
आप्तसौख्य बघणें नव्हें बरें २४

राजभक्ति तुमची स्वयंभुवा
प्रश्न हा उपजवी मला नवा
चित्तभंग तुमचा करूं तरी-
स्नेहबंध तुटतो न अंतरीं ! २५

देश आश्रयविहीन हा दिसे
स्थैर्य मी करुं तरी इथें कसें ?

जन्मभूमि[१] उघडी पडे अहा !
एक वेळ तिजला तरी पहा २६

चेतना स्फुरवि वाक्सरस्वती
लोचनांत जलबिंदु ठाकती
तद्वचास परिसून उत्कट
जाहले तदनुचारि उद्भट २७

**प्रतापाचें प्रस्थान:-**

प्राक्दिशेस अरुणांशु ठाकला
ताम्रचूडरव[२] कार्णि ऐकिला
देइ दुंदुभि चमूस जागृती
जाहलें स्फुरण तैं भटांप्रति २८

इंद्रचापपरिवेष—शोभिनी
हेमरूपरसरंगमंडिनी
ती उषा स्मितमुखी विलासिनी
वस्त्र सांवरित ये सुवासिनी २९

तो उदीच्य नगरीं उदेपुरीं
म्लेंच्छ-भार उतरावया त्वरीं
चालला प्रथित राजकेसरी
त्यास होति शकुनें किती तरी ३०

---

१ मेवाड २ कोंबड्याचा शब्द.

पक्षिवर्ग तरुवल्लिकांवरी
विस्तरी मधुर कंठमाधुरी
रत्नकांतिसम पुच्छधारिणी
नाचती नवपथीं मयूरिणी                ३१

पल्लवप्रसरिता द्रुमावली
वायुसंचलित सर्व जाहली
पुष्पकेसर विकीर्ण होउनी
राजशीर्षिं पडतात येउनी                ३२

सव्य भागिं उगवे प्रभामणि[१]
वामभागिं करिती खग ध्वनी
आग्रभागिं मृगवृंद धावतो
तासपक्षि गगनांत बोलतो                ३३

जो करी निजपदांकिता मही
येतसे प्रबलवीर निग्रही
' गोहिले[२] ' ' हटिल[२] ' जागजागचे
धोलपूर अजमीर कोटचे-                ३४

-येउनी मिळति त्या महोदया
यादवी विसरले करावया

१ सूर्य २ रजपूतांच्या जाती.

यावरी अधम राहिले तया
यातना न चुकल्या सहावया ३५

भाग्यवंत निजभूप लाभला
लाभ हाच गमला जनीं भला
लागती जन तदीय पावलां
पावला म्हणति देव पावला! ३६

नाचवीत नृप केतु चालला
लाल लाल महिखंड जाहला
'ला इलाह' रिपु बोलुं लागला
लाग शोधुन मनांत भागला ३७

जेथ जेथ जयदंड नाचला
तेथ तेथ भट--संघ लोटला
चालला नृपति कार्ययोजक
जन्मभूमिजनदर्शनोत्सुक ३८

राजधानींत प्रवेशः—

येतसे सदय नाथ पाहुनी
दावि हास्य नगरी वियोगिनी
आम्रपल्लवनियुक्त तोरणें
दर्शनीय दिसती गृहांगणें ३९

केशरप्रहित नीर सिंचिलें
गंधयुक्त पुरमार्ग जाहले
पद्मकांतिसमहस्तबालिका
काढिती विविध रंगवल्लिका ४०

रत्नकांतिमय कर्णकुंडलें
हालती अलक पुष्पकुड्मलें
सुंदरीमुख—शशी विलोभले
त्यामुळें गृहगवाक्ष शोभले ४१

राजमंत्रि, पुरवासि, वाक्पती
वेष मोहक तदीय संप्रतीं
सूत्रसंकलित संघ ठाकला
तोंच भूप पुढतीं विराजला ४२

भालदार ललकारिती किती
' श्रीप्रताप जय ' शद्ब बोलती
पालखींत नृपराज बैसला
मागुनी जनसमूह चालला ४३

मंगल ध्वनि अपार जाहले
मेघमंडल नभांत कांपलें
तो प्रसंग हृदयास हालवी
काय वर्णन करील हा ! कवी ४४

हर्षलें अमर अंबरांगणीं
अप्सरा करिति नृत्य गायनीं
वायु गंध पसरी चहूंकडे
दुःख एक न जनांत सांपडे ४५

वाहती जन सुपुष्प--मालिका
झांकली रुचिर राजवाहिका[१]
बैसला नृप गजीं जनास्तव
भाट लोक करितात तत्स्तव ४६

चाप--बाणयुत भिल्ल सैनिक
पाहुनी करिति लोक कौतुक
जे सहायक वनीं नृपाप्रती
पूजनार्ह गमले जनीं किती ? ४७

जो गुलाल जनताकरांतला
भूतलावर उडून पातला
लाल लाल पथ सर्व जाहला
पावलें उमटतात त्या स्थला. ४८

व्याधिमुक्त धरणीश्वरांगना
शोभली पतिसवें शुभानना

१ पालखी.

चंद्र आणि जणु चंद्रिका जनीं
भासती उभय ते प्रतिक्षणीं २६.

तो प्रताप बसला निजासनीं
तोषली जनसभा तदा मनीं
वर्णिला किति जरी प्रसंग तो
राहिला तरि अपूर्ण वाटतो. २७

---

समाप्त.

REFBK-0004250
REFBK-0004250
४२५०

# काव्यकिरण--माला.

[ सं० व प्र०—मि. का. भोरटके ]

अगाऊ त्रैवार्षिक वगणी ५॥ रु.

या मालेंतून आजवर बाहेर पडलेलें वाङ्मय काव्यरसिकांस आनंद देणारें तर आहेच पण मराठी काव्याचा काळजीपूर्वक अभ्यास करणाऱ्यांस तें अत्यंत उपयुक्तही आहे. सामाजिक, ऐतिहासिक सुंदर खंडकाव्यें, चित्रकाव्यें, स्फुटकविता, रसाळ अभंग, मार्मिक निबंध, हिंदी काव्याचीं भाषांतरें अशा विविध प्रकारांनीं वरील वाङ्मयास शोभा आली असून त्यायोगानें मराठी भाषेंत महत्त्वाची भर पडली आहे. महाराष्ट्रीयांनीं मालेस आश्रय देऊन असें वाङ्मय संग्रहीं ठेवणें जरूर आहे. साडेपांच रुपये वर्गणींतून बारा आणे प्रवेश फी वजा जातां बाकीच्या पावणे पांच रुपयांची फेड दर तीन महिन्यांनीं एक याप्रमाणें पुस्तकरूपानें केली जाईल. पुस्तकांची किंमत चार ते आठ आणे पर्यंत असते. वर्गणीदारांस पुस्तक पाऊणपट किंमतीस मिळतें.

मालेंतून आतांपर्यंत पुढील पुस्तकें नियमितपणें प्रकाशित झालीं आहेत.

१ महाराणा प्रतापसिंह ( खंडकाव्य, सचित्र दुसरी आ. ) ८१०
२ मान्यांची यमुना ( ,, ) ... ... ८६
३ चंडीशतक ( चित्र काव्यासह ) ... ... ८१२
४ कविता—वनिता ( वनिता विषयक सुंदर कवितांचा संग्रह ८८
५ कुमुद्वती ( स्फुट कविता ) ... ... ८८
६ शिवप्रताप ( भूषण कवीच्या शिवाबावनीचें भाषांतर ) ८८
७ मराठी कवि-विरुद्ध प्रौ० पटवर्धन [ निबंध ] ... ८६
८ अभंगमाला [ आवृत्ति दुसरी ] ... ... ८७

हीं सर्व पुस्तकें श्री. कवि तिवारी ह्यांचीं आहेत.

**मि. का. भोरटके.**

जळगांव पूर्व खानदेश

शाळांचे बक्षीससमारंभ आणि वाचनालयें यांजकरितां
मुंबई-इलाखा आणि वऱ्हाड-मध्यप्रांत सरकारांनीं मंजूर केलेल्या
—अजमासें एक हजार—

# "मंजूर पुस्तकांची जंत्री"

आमचेकडे छापून तयार आहे. किंमत ८६ व पोस्टेज् ८१

(१) डिस्ट्रिक्ट् व म्युनिसिपल् स्कूलबोर्डें, गांवपंच व शाळा-मास्तर ह्यांना बक्षीस पुस्तकांच्या याद्या तयार करितांना जरूर तीं पुस्तकें निवडून घालण्यास ह्या जंत्रीचा अत्यंत उपयोग होतो.

(२) जंत्रींतलीं बहुतेक पुस्तकें आमच्या स्टॉकमध्यें भरपूर व किफायतशीर मिळतील अशी सोय आहे. ह्यामुळें—

**आमचें ग्रंथभांडार हें विक्रीचें मोठें केंद्र बनलें आहे.**

(३) कारण इतस्ततः वास्तव्य करीत असलेल्या शेंकडों ग्रंथकर्त्यांशीं व प्रकाशकांशीं पृथक्पृथक् पत्रव्यवहारानें थेट कायमचा संबंध निगडीत करून हजारों पुस्तकें विक्रीसाठीं एकेठिकाणीं जमविण्याचा पद्धतशीर प्रयत्न आमचा सतत चालू आहे व तो वाङ्मयाचे अभिवृद्धीला पोषक होणारा आहे.

(४) ह्या बक्षीस पुस्तकांवर वेगवेगळें कमिशन शें. १० पासून २५ पर्यंत ऑर्डरीच्या मानानें कमीज्यास्ती आम्ही देऊं शकतों. विशेष खुलासा पत्रद्वारें होईल.

**दत्तात्रय कंपनी "ग्रंथभांडार" जळगांव पू. खा.**

# तिवारींचीं पुस्तकें

| | | |
|---|---|---|
| * १ | काव्यकुसुमांजली ( छापत आहे ) ... | ०१० |
| २ | काव्यरत्नमाला ... ... ... | २॥ |
| ३ | मनोहरलीला ( खंडकाव्य ) ... ... | ०६ |
| * ४ | प्रसन्नराधा ,, ... ... | ०६ |
| * ५ | महाराणा प्रतापसिंह ( खंडकाव्य, सचित्र २ री आवृत्ति) | ०१० |
| ६ | मान्यांची यमुना ,, ... ... | ०६ |
| ७ | अभंगमाला ( आवृत्ति दुसरी ) ... ... | ०७ |
| * ८ | कविता--वनिता ... ... ... | ०८ |
| × ९ | शिवप्रताप ... ... ... | ०८ |
| × १० | कुमुद्वती ... ... ... | ०८ |
| ११ | मराठ्यांचीं संग्रामगीतें ( सचित्र आवृत्ति [illegible] वी ) | १०= |
| १२ | झांशीची संग्रामदेवता ( आवृति तिसरी ) | ०१० |
| [illegible] | [illegible] ( सचित्र खंडकाव्य ) ... ... | ०१० |
| १४ | चंडीशतक ( चित्रबंधासह ) ... ... | ०१२ |
| १५ | मराठी कवि विरुद्ध प्रो. वा. ब. पटवर्धन बी. ए. | ०६ |
| १६ | नंदिनी ( सचित्र खंडकाव्य ) ... ... | ०८ |

पहिलीं दहा पुस्तकें मुंबई विद्याखात्यानें मंजूर केलीं आहेत. आणि ह्याच दहा पुस्तकांस महाराष्ट्रग्रंथोत्तेजक मंडळ इंदूर या संस्थेनें बक्षिसें दिलीं आहेत.

१।२।५।६।७।९।१० व १५ ह्या नंबरचीं बुकें नागपूर विद्याखात्यानें मंजूर केलीं आहेत.

* ह्या पुस्तकांस दक्षिणाप्राइज कमेटीनें बक्षिसें दिलीं आहेत. व × ह्या पुस्तकांस शिफारस पत्रें दिलीं आहेत.

सर्व पुस्तकें मिळण्याचे पत्ते:—

१ दु० आ० तिवारी, जळगांव पू. खा-

२ परचुरे आणि मंडळी, माधवबाग मुंबई नं.४

३ दत्तात्रय कंपनी – जळगांव, पू० खा०